Government of Karnataka

माय मराठी

इयत्ता सहावी

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

6

Sixth Standard

Marathi First Language

Part - 1

Karnataka Text Book Society (R.)
6th Cross, Malleshwaram
Bangalore - 560 003.

Preface

The Textbook Society, Karnataka has been engaged in producing new textbooks according to the new syllabi which in turn are designed on NCF – 2005 since June 2010. Textbooks are prepared in 12 languages; seven of them serve as the media of instruction. From standard 1 to 4 there is the EVS, mathematics and 5th to 10th there are three core subjects namely mathematics, science and social science.

NCF – 2005 has a number of special features and they are:

- Connecting knowledge to life activities.
- Learning to shift from rote methods.
- Enriching the curriculum beyond textbooks.
- Learning experiences for the construction of knowledge.
- Making examinations flexible and integrating them with classroom experiences.
- Caring concerns within the democratic policy of the country.
- Make education relevant to the present and future needs.
- Softening the subject boundaries, integrated knowledge and the joy of learning.
- The child is the constructor of knowledge.

The new books are produced based on three fundamental approaches namely. Constructive approach, Spiral Approach and Integrated approach

The learner is encouraged to think, engage in activities, masters skills and competencies. The materials presented in these books are integrated with values. The new books are not examination oriented in their nature. On the other hand they help the learner in the total development of his/her personality, thus help him/her become a healthy member of a healthy society and a productive citizen of this great country, India.

Language textbooks are designed to help learners master communicative competencies, excellent comprehension, meaningful expression and efficient reference skills.

English is studied by most students as the second language. Teachers have to keep in mind the three fundamental approaches based on which the readers have been designed and adapt their teaching methods and help learners master language skills and competencies and help them become excellent users of English.

Schools in Karnataka offer seven languages as media of instruction and eight as first languages and ten languages are offered as third language. The objective is to help the learners to use these languages efficiently at the communicative level. It is hoped that at least a cross section of learners achieve competencies to use these languages at the creative level.

Teachers are expected to adapt their teaching methods not to make these textbooks just feed materials for examinations, but help learners master language competencies such as communication, comprehension, expression in writing and necessary reference skills.

The Textbook Society expresses grateful thanks to the chairpersons, writers, scrutinisers, artists, staff of DIETs and CTEs and the members of the Editorial Board and printers in helping the Text Book Society in producing these textbooks.

Nagendra Kumar
Managing Director
Karnataka Textbook Society®
Bengaluru, Karnataka

Prof G S Mudambadithaya
Coordinator
Curriculum Revision and Textbook Preparation
Karnataka Textbook Society®
Bengaluru, Karnataka

NOT TO BE REPUBLISHED

हितगुज

मित्रहो,

भारतीय शिक्षण पध्दतीमध्ये अत्याधुनिकता आणण्यासाठी आणि शिक्षण अधिकाधिक विद्यार्थीकेंद्रित करण्यासाठी नवनवीन पध्दतींचा अवलंब केला जात आहे. पंचवार्षिक योजनां प्रमाणे विशिष्ट टप्प्यावर शैक्षणिक सुधारणांचे पुनरावलोकन करून वेळोवेळी बदलही केले जात आहेत. अर्थात शैक्षणिक सुधारणा करताना अलिकडच्या पंचवीस वर्षात 'समान राष्ट्रीय शैक्षणिक कार्यक्रम' राबविण्यात आला. याची भारतवासीयांनी आवर्जून दखल घ्यायला हवी असे सांगावेसे वाटते.

सन 1986 मध्ये 'नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण' स्विकारून शिक्षण पध्दतीत राष्ट्रीय समानतेचा पाया घातला गेला. 1998 पासून संपूर्ण देशभर ''सामर्थ्यावर आधारीत शिक्षण'' या सुधारित योजनेचा प्रारंभ झाला, आणि सुशिक्षित विद्यार्थ्यांना किमान सामर्थ्ये प्राप्त करून देण्याची जबाबदारी एक राष्ट्रीय कर्तव्य म्हणून शिक्षक बंधू भगिनीनी स्विकारली आहे असे दिसून येत आहे.

बदलत्या काळाप्रमाणे आपण स्वत:च्या राहणीमान आचार विचारात बदल करत असतो. शिक्षण क्षेत्र त्याला अपवाद नाही. अत्याधुनिकता आत्मसात करणे, नव विचार घेऊन पुढे जाणे. हा तर 'विद्या सरितेचा' स्थायीभाव आहे. बदल म्हणण्यापेक्षा समाजाभिमुख असलेले समाजोपयोगी 'नवविचार' ही काळाची गरज असते. राष्ट्रीय पातळीवर या नवविचारांचे मंथन निरंतर होत असते. या विचारमंथनातून तयार होणारे 'नवनीत' बालविकासाला पुष्टिकर असेल, अशी आशा मनी बाळगून 2005 मध्ये 'राष्ट्रीय अभ्यासक्रमाचा आराखडा' तयार करण्यात आला. एन.सी.ई. आर. टी. मध्ये तयार झालेल्या या राष्ट्रीय विचाराला 'एन. सी.एफ. 2005' असे संबोधण्यात आले आहे. या 'नॅशनल करिक्युलम फ्रेम वर्क 2005' प्रमाणे तयार केलेले प्रस्तुत पाठ्यपुस्तक आपल्या हाती देताना 'राष्ट्रीय विचारांचे बीजारोपण' करीत आहोत असा ठामविश्वास पाठ्यपुस्तक मंडळाला वाटतो आहे.

© RIEP NOT TO BE REPUBLISHED

सत्य आणि अहिंसेच्या तत्वांवर दृढ विश्वास असणाऱ्या महात्मा गांधीजीनाही मानवी हक्कांसाठी 'छोडो भारत' सारखी चळवळ उभारून 'चलेजाव' चा नारा द्यावा लागला, स्वातंत्र्यासाठी 'करो वा मरो' ही घोषणा द्यावी लागली, म्हणजेच कणखर व्हावे लागले, हे ऐतिहासिक सत्य विसरून चालणार नाही.

'एन.सी.एफ. 2005' मधून विचाराने, आचाराने कणखर आणि प्रतिभासंपन्न भारताच्या उभारणीचे बीजारोपण केले आहे.

शिक्षणाच्या या नवविचारातून प्रेरणा घेऊन भाषा, गणित, विज्ञान आणि विशेषतः समाजविज्ञान या सर्वच विषयातून एक प्रगल्भ राष्ट्रीय चेतना देण्याचे ध्येय 'भारतीय शिक्षणाने' उराशी बाळगले आहे. या राष्ट्रीय ध्येयाचा उद्देश 'बलसागर भारत होवो। विश्वात शोभूनी राहो'। या पूज्य साने गुरुजींच्या शब्दांत सांगून पाठ्यपुस्तक मंडळ आपले हितगुज पूर्ण करीत आहे.

या राष्ट्रीय ध्येयाप्रत घेऊन जाण्यासाठी प्रस्तुत पाठ्यपुस्तक केवळ एक माध्यम आहे. वैचारिक बीजारोपणाचे ते एक साधन आहे. या साधनात सुधारणा करण्यासाठी सर्व शिक्षणप्रेमी जनता, शिक्षक बंधू, भगिनींच्या विधायक सूचनांचे पाठ्यपुस्तक निर्देशनालयात स्वागत आहे.

प्रस्तुत पाठ्यपुस्तकाच्या निर्मिती मध्ये सहकार्य केलेल्या सर्व कवी, लेखक, आणि हितचिंतक कार्यकर्त्यांचे पाठ्यपुस्तक मंडळ आभारी आहे.

पाठ्यपुस्तक मंडळ

© SCERT NOT TO BE REPUBLISHED

Text Book Committee

Chairman :

1) **Sri P.K. Muchandikar,** A.M., Govt. Marathi Higher Primary School Konewadi, Belagavi.

Members :

1) **Sri S.D. Pakhare,** A.M., Govt. Marathi Higher Pry. School Kadoli, Belagavi
2) **Sri J.S. Mali,** H.M., Govt. Marathi Higher Pry. School, Kurli Chikodi Dist., Belagavi.
3) **Sri A.S. Buvaji,** A.M., Govt. Marathi Lower Pry. School, Jainkop, Khanapur Dist. Belagavi
4) **Sri I.S. Patil,** A.M., Govt. Marathi Higher Pry. School Tarihal, Belagavi
5) **Smt. Sangeeta Deshpande,** A.M., V.M. Shanbhag Marathi School Bhagyanagar, Tilakwadi, Belagavi.

Artist :

6) **Sri Tharakesh,** Govt. High School, Bannitalpur, Gundlupete, Dist-Chamarajanagar.

Scrutinizer :

7) **Sri Madhav Kunte,** A.M., Smt. Ushatai, Gogate Girls High School, Belagavi

Chief Co-ordinator :

Prof. G.S. Mudambadithaya, Co-ordinator, Curriculum Revision and Text Preparation, Karnataka Textbook Society® Bengaluru.

Chief Advisers :

Sri Nagendra kumar, Managing Director, KTBS, Bengaluru.

Sri C. Nagamani, Deputy Director, KTBS, Bengaluru.

Programme Co-ordinator:

Smt. Chandrakala, Assistant Director, KTBS, Bengaluru.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

ಪರಿಷ್ಕರಣೆ ಕುರಿತು

ಒಂದರಿಂದ ಹತ್ತನೇ ತರಗತಿಯ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಬಗ್ಗೆ ಪ್ರಕಟಗೊಂಡ ಸಾರ್ವಜನಿಕ ಅಭಿಪ್ರಾಯಗಳನ್ನು ಗಮನಿಸಿ ಮಾನ್ಯ ಮುಖ್ಯಮಂತ್ರಿಯವರೂ ಅರ್ಥಸಚಿವರೂ ಆಗಿರುವ ಶ್ರೀ ಸಿದ್ದರಾಮಯ್ಯನವರು ತಮ್ಮ 2014–15 ರ ಬಜೆಟ್‌ನಲ್ಲಿ ತಜ್ಞರ ಸಮಿತಿಯನ್ನು ರಚಿಸುವ ಘೋಷಣೆ ಮಾಡಿದರು. ತಜ್ಞರು ಅನುಸರಿಸಬೇಕಾದ ಮೂಲ ಆಶಯವನ್ನು ಹೀಗೆ ಹೇಳಿದರು: "ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಸಾಮಾಜಿಕ ಸಾಮರಸ್ಯ, ನೈತಿಕಮೌಲ್ಯಗಳು, ವ್ಯಕ್ತಿತ್ವವಿಕಸನ, ವೈಜ್ಞಾನಿಕ ಮತ್ತು ವೈಚಾರಿಕ ಮನೋಭಾವ, ಜಾತ್ಯತೀತತೆ ಮತ್ತು ರಾಷ್ಟ್ರೀಯ ಬದ್ಧತೆಗಳಿಗೆ ಅನುವಾಗುವಂತೆ ತಜ್ಞರ ಸಮಿತಿಯನ್ನು ಪುನರ್ ರಚಿಸಲಾಗುವುದು" – ಇದು ಬಜೆಟ್ ಭಾಷಣದಲ್ಲಿ ಸಾದರಪಡಿಸಿದ ಆಶಯ.

ಆನಂತರ ಶಿಕ್ಷಣ ಇಲಾಖೆಯು ಒಂದರಿಂದ ಹತ್ತನೇ ತರಗತಿಯವರೆಗಿನ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಪರಿಷ್ಕರಣೆಗಾಗಿ 27 ಸಮಿತಿಗಳನ್ನು ರಚಿಸಿ ದಿನಾಂಕ: 24.11.2014 ರಂದು ಆದೇಶಹೊರಡಿಸಿತು. ಈ ಸಮಿತಿಗಳು ವಿಷಯವಾರು ಮತ್ತು ತರಗತಿವಾರು ಮಾನದಂಡಕ್ಕನುಗುಣವಾಗಿ ರಚಿತವಾದವು. ವಿವಿಧ ಪಠ್ಯವಿಷಯಗಳಿಗೆ ಸಂಬಂಧಿಸಿದ ತಜ್ಞರು, ಅಧ್ಯಾಪಕರು ಈ ಸಮಿತಿಗಳಲ್ಲಿದ್ದಾರೆ. ಈಗಾಗಲೇ ಲಿಖಿತವಾಗಿ ಬಂದಿರುವ ಅನೇಕ ಆಕ್ಷೇಪಗಳು ಮತ್ತು ವಿಶ್ಲೇಷಣೆಗಳನ್ನು ಪರಿಶೀಲಿಸಿ, ತಪ್ಪು ಒಪ್ಪುಗಳ ಬಗ್ಗೆ ನಿರ್ಣಯಿಸಿ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಪರಿಷ್ಕರಿಸುವ ಹೊಣೆಹೊತ್ತ ಈ ಸಮಿತಿಗಳಿಗೆ 'ಅಗತ್ಯವಿದ್ದಲ್ಲಿ ಪಠ್ಯವಸ್ತುವನ್ನು ಪರಿಷ್ಕರಿಸಿ ನಂತರ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಪರಿಷ್ಕರಿಸುವ' ಸ್ವಾತಂತ್ರ್ಯವನ್ನು 24.11.2014ರ ಆದೇಶದಲ್ಲೇ ನೀಡಲಾಗಿತ್ತು. ಆನಂತರ 19.09.2015 ರಂದು ಹೊಸ ಆದೇಶ ಹೊರಡಿಸಿ 'ಅಗತ್ಯವಿದ್ದಲ್ಲಿ ಪುನರ್ ರಚಿಸುವ' ಸ್ವಾತಂತ್ರ್ಯವನ್ನು ನೀಡಲಾಯಿತು. ಹೀಗೆ ಸಮಗ್ರ ಪರಿಷ್ಕರಣೆಗೊಂಡ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು 2016–17 ರ ಬದಲು 2017–18ನೇ ಶೈಕ್ಷಣಿಕ ವರ್ಷದಲ್ಲಿ ಜಾರಿಗೊಳಿಸಲಾಗುವುದೆಂದು ಇದೇ ಆದೇಶದಲ್ಲಿ ತಿಳಿಸಲಾಯಿತು.

ಅನೇಕ ವ್ಯಕ್ತಿಗಳೂ ಸಂಘಟನೆಗಳೂ ಸ್ವಯಂಪ್ರೇರಿತರಾಗಿ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಮಾಹಿತಿದೋಷ, ಆಶಯದೋಷಗಳನ್ನು ಪಟ್ಟಿಮಾಡಿ ಶಿಕ್ಷಣ ಸಚಿವರಿಗೆ, ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘಕ್ಕೆ ಕಳುಹಿಸಿದ್ದರು. ಅವುಗಳ ಪರಿಶೀಲನೆಮಾಡಿದ್ದಲ್ಲದೆ, ಸಮಿತಿಗಳಾಚೆಗೆ ಅನೇಕ ಸಂವಾದಗಳನ್ನು ಏರ್ಪಡಿಸಿ ವಿಚಾರ ವಿನಿಮಯ ಮಾಡಿಕೊಂಡಿದ್ದೇವೆ. ಪ್ರಾಥಮಿಕ ಮತ್ತು ಪ್ರೌಢಶಾಲಾ ಅಧ್ಯಾಪಕರ ಸಂಘಗಳ ಜೊತೆ ಚರ್ಚಿಸಿದ್ದಲ್ಲದೆ ಪ್ರಶ್ನಾವಳಿ ಸಿದ್ಧಪಡಿಸಿ ಅಧ್ಯಾಪಕರಿಗೆ ಕಳಿಸಿ ಅಭಿಪ್ರಾಯಗಳನ್ನು ಸಂಗ್ರಹಿಸಲಾಗಿದೆ. ಅಧ್ಯಾಪಕರು, ವಿಷಯಪರಿವೀಕ್ಷಕರು ಮತ್ತು ಡಯಟ್ ಪ್ರಾಂಶುಪಾಲರ ಪ್ರತ್ಯೇಕ ಸಭೆಗಳನ್ನು ನಡೆಸಿ ವಿಶ್ಲೇಷಣಾತ್ಮಕ ಅಭಿಮತಗಳನ್ನು ಪಡೆಯಲಾಗಿದೆ. ವಿಜ್ಞಾನ, ಸಮಾಜವಿಜ್ಞಾನ, ಗಣಿತ, ಭಾಷೆ ಸಾಹಿತ್ಯಗಳಿಗೆ ಸಂಬಂಧಿಸಿದ ತಜ್ಞರಿಗೆ ಮೊದಲೇ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಕಳುಹಿಸಿ ಆನಂತರ ಸಭೆ ನಡೆಸಿ ಚರ್ಚಿಸಲಾಗಿದೆ. ಮಹಿಳಾ ಸಂಘಟನೆ ಹಾಗೂ ವಿಜ್ಞಾನ ಸಂಬಂಧಿ ಸಂಸ್ಥೆಗಳನ್ನು ಆಹ್ವಾನಿಸಿ ಚಿಂತನೆ ನಡೆಸಲಾಗಿದೆ. ಹೀಗೆ ಎಲ್ಲಾ ಮೂಲಗಳಿಂದ ಪಡೆದ ಅರಿವಿನ ಆಧಾರದ ಮೇಲೆ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಅಗತ್ಯವಿದ್ದಕಡೆ ಪರಿಷ್ಕರಿಸಲಾಗಿದೆ.

NOT TO BE REPUBLISHED

ಬಹುಮುಖ್ಯವಾದ ಇನ್ನೊಂದು ಸಂಗತಿಯನ್ನು ಇಲ್ಲಿ ಹೇಳಬೇಕು. ಕೇಂದ್ರೀಯ ಶಾಲಾ (N.C.E.R.T) ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಜೊತೆ ರಾಜ್ಯದ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ತೌಲನಿಕವಾಗಿ ಅಧ್ಯಯನ ಮಾಡಿ ಸಲಹೆಗಳನ್ನು ನೀಡಲು ವಿಜ್ಞಾನ, ಗಣಿತ ಮತ್ತು ಸಮಾಜವಿಜ್ಞಾನಕ್ಕೆ ಸಂಬಂಧಿಸಿದಂತೆ ತಜ್ಞರ ಮೂರು ಸಮಿತಿಗಳನ್ನು ರಚಿಸಲಾಯಿತು. ಈ ಸಮಿತಿಗಳು ನೀಡಿದ ತೌಲನಿಕ ವಿಶ್ಲೇಷಣೆ ಮತ್ತು ಸಲಹೆಗಳನ್ನು ಆಧರಿಸಿ ರಾಜ್ಯ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಗುಣಮಟ್ಟವನ್ನು ಹೆಚ್ಚಿಸಲಾಗಿದೆ. ಕೇಂದ್ರೀಯ ಶಾಲಾ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳಿಗಿಂತ ನಮ್ಮ ರಾಜ್ಯದ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಗುಣಮಟ್ಟ ಕಡಿಮೆಯಾಗದಂತೆ ಕಾಯ್ದುಕೊಳ್ಳಲಾಗಿದೆ. ಜೊತೆಗೆ ಆಂಧ್ರ, ತಮಿಳುನಾಡು, ಮಹಾರಾಷ್ಟ್ರಗಳ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಜೊತೆ ನಮ್ಮ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಪರಿಶೀಲಿಸಲಾಗಿದೆ.

ಇನ್ನೊಂದು ಸ್ಪಷ್ಟನೆಯನ್ನು ನೀಡಲು ಬಯಸುತ್ತೇನೆ. ನಮ್ಮ ಸಮಿತಿಗಳು ಮಾಡಿರುವುದು ಪರಿಷ್ಕರಣೆಯೇ ಹೊರತು ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಸಮಗ್ರ ರಚನೆಯಲ್ಲ. ಆದ್ದರಿಂದ ಈಗಾಗಲೇ ರಚಿತವಾಗಿರುವ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಸ್ವರೂಪಕ್ಕೆ ಎಲ್ಲಿಯೂ ಧಕ್ಕೆಯುಂಟುಮಾಡಿಲ್ಲ. ಲಿಂಗತ್ವ ಸಮಾನತೆ, ಪ್ರಾದೇಶಿಕ ಪ್ರಾತಿನಿಧ್ಯ, ರಾಷ್ಟ್ರೀಯ ಸಮಗ್ರತೆ, ಸಮಾನತೆ, ಸಾಮಾಜಿಕ ಸಾಮರಸ್ಯಗಳ ಹಿನ್ನೆಲೆಯಲ್ಲಿ ಕೆಲವು ಪರಿಷ್ಕರಣೆಗಳು ನಡೆದಿವೆ. ಹೀಗೆ ಪರಿಷ್ಕರಿಸುವಾಗ ರಾಷ್ಟ್ರೀಯ ಪಠ್ಯಕ್ರಮ ಚೌಕಟ್ಟು ಮತ್ತು ರಾಜ್ಯ ಪಠ್ಯಕ್ರಮ ಚೌಕಟ್ಟುಗಳನ್ನು ಮೀರಿಲ್ಲವೆಂದು ತಿಳಿಸಬಯಸುತ್ತೇನೆ: ಜೊತೆಗೆ ನಮ್ಮ ಸಂವಿಧಾನದ ಆಶಯಗಳನ್ನು ಅನುಸರಿಸಲಾಗಿದೆ. ಸಮಿತಿಗಳು ಮಾಡಿದ ಪರಿಷ್ಕರಣೆಯನ್ನು ಮತ್ತೊಮ್ಮೆ ಪರಿಶೀಲಿಸಲು ವಿಷಯವಾರು ಉನ್ನತ ಪರಿಶೀಲನ ಸಮಿತಿಗಳನ್ನು ರಚಿಸಿ ಅಭಿಪ್ರಾಯಪಡೆದು ಅಳವಡಿಸಲಾಗಿದೆ.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

ಹೀಗೆ ಕ್ರಮಬದ್ಧವಾಗಿ ನಡೆದ ಕೆಲಸಕ್ಕೆ ತಮ್ಮನ್ನು ತಾವು ಸಂಪೂರ್ಣ ತೊಡಗಿಸಿಕೊಂಡ 27 ಸಮಿತಿಗಳ ಅಧ್ಯಕ್ಷರು ಮತ್ತು ಸದಸ್ಯರನ್ನು ಹಾಗೂ ಉನ್ನತ ಪರಿಶೀಲನಾ ಸಮಿತಿಯ ಸಮಸ್ತರನ್ನು ಕೃತಜ್ಞತೆಯಿಂದ ನೆನೆಯುತ್ತೇವೆ. ಅಂತೆಯೇ ಸಮಿತಿಗಳ ಕೆಲಸ ಸುಗಮವಾಗಿ ನಡೆಯುವಂತೆ ವ್ಯವಸ್ಥೆಮಾಡಲು ಕಾರ್ಯಕ್ರಮ ಅಧಿಕಾರಿಗಳಾಗಿ ನಿಷ್ಠೆಯಿಂದ ದುಡಿದ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘದ ಎಲ್ಲಾ ಅಧಿಕಾರಿಗಳನ್ನೂ ನೆನೆಯುತ್ತೇವೆ. ಸಹಕರಿಸಿದ ಸಿಬ್ಬಂದಿಗೂ ನಮ್ಮ ವಂದನೆಗಳು. ಅಭಿಪ್ರಾಯ ನೀಡಿ ಸಹಕರಿಸಿದ ಸರ್ವ ಸಂಘಟನೆಗಳು ಮತ್ತು ತಜ್ಞರಿಗೆ ಧನ್ಯವಾದಗಳು.

ಎಂ. ಪಿ. ಮಾದೇಗೌಡ
ವ್ಯವಸ್ಥಾಪಕ ನಿರ್ದೇಶಕರು
ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ (ರಿ)
ಬೆಂಗಳೂರು

ಪ್ರೊ. ಬರಗೂರು ರಾಮಚಂದ್ರಪ್ಪ
ಸರ್ವಾಧ್ಯಕ್ಷರು
ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಪರಿಷ್ಕರಣ ಸಮಿತಿ
ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ (ರಿ)
ಬೆಂಗಳೂರು

ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಪರಿಷ್ಕರಣ ಸಮಿತಿಗಳ ವಿವರ

ಸರ್ವಾಧ್ಯಕ್ಷರು

ಪ್ರೊ. ಬರಗೂರು ರಾಮಚಂದ್ರಪ್ಪ : ರಾಜ್ಯ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಪರಿಷ್ಕರಣ ಸಮಿತಿ, ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ(ರಿ), ಬೆಂಗಳೂರು.

ಪರಿಷ್ಕರಣ ಸಮಿತಿ

ಅಧ್ಯಕ್ಷರು

ಶ್ರೀಮತಿ ಎಸ್.ವಿ. ದೇಶಪಾಂಡೆ : ಸಹಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ಆರ್.ಪಿ.ಡಿ ಕಾಲೇಜ್, ಬೆಳಗಾವಿ.

ಸದಸ್ಯರು

ಶ್ರೀಮತಿ ಕಿಶೋರಿ ಡಿ. ಜೋಷಿ : ನಿವೃತ್ತ ಸಹಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ಮರಾಠಿ ವಿಭಾಗ, GI ಬಾಗೇವಾಡಿ ಕಾಲೇಜು, ನಿಪ್ಪಾಣಿ.

ಪ್ರೊ.ಎಸ್.ಎಸ್. ಚೌಹಾನ್ : ಸಹಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು ಮರಾಠಿ ವಿಭಾಗ, ಮರಾಠಿ ಮಂಡಲ ಕಾಲೇಜು, ಬೆಳಗಾವಿ.

ಶ್ರೀಮತಿ. ಅಲಕಾ ಮುತ್ಕೇಕರ್ : ಸಹಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ಮರಾಠ ಮಂಡಳ ಕಾಲೇಜು.

ಡಾ.ಎಸ್.ಎಂ ರಾಯಮಾನೆ : ಸಹಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ಕೆ.ಎಲ್.ಇ, ಬಿ.ಕೆ ಕಾಲೇಜು, ಚಿಕ್ಕೋಡಿ.

ಶ್ರೀ.ಪ್ರಕಾಶ್ ಬಿ.ನಾಗರ್ಲೆ : ನಿವೃತ್ತ ಶಿಕ್ಷಕರು, ಮುನಿಸಿಪಲ್ ಪ್ರೌಢಶಾಲೆ, ನಿಪ್ಪಾಣಿ, ಚಿಕ್ಕೋಡಿ ತಾ. ಬೆಳಗಾವಿ ಜಿಲ್ಲೆ.

ಉನ್ನತ ಪರಿಶೀಲನ ಸಮಿತಿ

ಶ್ರೀ ಸರಜು ಕಾಟ್ಕರ್ : ಮಹಾಂತೇಶ್ ನಗರ, ಬೆಳಗಾವಿ.

ಶ್ರೀ ರಾಮಕೃಷ್ಣ ಮಾರುತಿ ಮರಾಠೆ : ಶ್ರೀಕಲ್ಪ , ಶಾಂತಿ ನಿಕೇತನ, ಟೀಚರ್ಸ್ ಕಾಲೋನಿ, ಬೆಳಗಾವಿ.

ಡಾ. ಗೋಪಾಲ್.ಎಸ್.ಮಹಾಮುನಿ ಅಲಿಯಾಸ್ ಸುತಾರ್ : ಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ಶಾಂತಿನಗರ, ಚಿಕ್ಕೋಡಿ ತಾ. ಬೆಳಗಾವಿ ಜಿಲ್ಲೆ.

ಸಲಹೆ ಮತ್ತು ಮಾರ್ಗದರ್ಶನ:

ಶ್ರೀ ಎಂ. ಪಿ. ಮಾದೇಗೌಡ, : ವ್ಯವಸ್ಥಾಪಕ ನಿರ್ದೇಶಕರು, ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ(ರಿ), ಬೆಂಗಳೂರು–3.

ಶ್ರೀಮತಿ ಎಂ. ಡಿ. ಉಷಾ : ಉಪನಿರ್ದೇಶಕರು, ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ(ರಿ), ಬೆಂಗಳೂರು–3.

ಕಾರ್ಯಕ್ರಮ ಸಂಯೋಜಕರು:

ಎಲ್. ಶಂಕರೇಗೌಡ, : ಸಹಾಯಕ ನಿರ್ದೇಶಕರು, ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ(ರಿ), ಬೆಂಗಳೂರು–3.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

पहिले सत्र

अनुक्रमणिका

R8F9M7

अ.नं.	पाठाचे/कवितेचे नाव	लेखक/कवी	मूल्ये	पृ.क्र.
1.	देहमंदिर चित्त मंदिर ★	वसंत बापट	श्रद्धा, नम्रता अंधश्रद्धा निर्मूलन	1
2.	वीर राणी चन्नम्मा	संकलित	शौर्य, देशभक्ती	6
3.	निसर्गातील चमत्कार वीज	श्रीमती मानसी वैद्य	वैज्ञानिक मनोभाव	14
4.	पाऊस ★	संकलित	सहानुभूती, निसर्ग प्रेम	24
5.	बुद्धिबळ	-	विश्वास, ध्येयधोरण, नेतृत्व	27
6.	सत्यकाम	संकलित	आदर्श आचार स्वामीनिष्ठा, साधेजीवन	38
7.	जात कोणती पुसू नका ★	यशवंत देव	अस्पृश्यता निवारण धर्म निरपेक्षता	45
8.	माझे ध्येय	-	आत्मविश्वास, आदर्श आचार	48
9.	राष्ट्रसंत तुकडोजी महाराज	संकलित	व्यक्ति महात्म्य, परस्पर सहकार्याची भावना, स्वच्छता	61
10.	विद्यार्थ्यांना बोध	समर्थ रामदास	नीती, जीवन शिक्षण	68
	✻ चित्रकथा			70


✻ अशी खूण केलेल्या कविता पाठांतरासाठी आहेत.

@MTBS NOT TO BE REPUBLISHED

पहिले सत्र

1. देह मंदिर, चित्त मंदिर

U8D4Y4



देह मंदिर, चित्त मंदिर, एक तेथे प्रार्थना
सत्य-सुंदर-मंगलाची नित्य हो आराधना ।।धृ।।

दुःखितांचे दुःख जावो ही मनाची कामना
वेदना जाणावयाला जागवू संवेदना
दुर्बलांच्या रक्षणाला पौरूषाची साधना
सत्य-सुंदर-मंगलाची नित्य हो आराधना ।।1।।

जीवनी नवतेज राहो, अंतरंगी भावना
सुंदराचा वेध लागो मानवाच्या जीवना
शौर्य लाभो, धैर्य लाभो सत्यता संशोधना
सत्य-सुंदर-मंगलाची नित्य हो आराधना ।।2।।

भेद सारे मावळू द्या, वैर साऱ्या वासना
मानवाच्या एकतेची पूर्ण होवो कल्पना
मुक्त आम्ही फक्त मानू बंधूतेच्या बंधना
सत्य-सुंदर-मंगलाची नित्य हो आराधना ।।3।।

कवी-वसंत बापट

© SCERT NOT TO BE REPUBLISHED

नवीन शब्दार्थ.

देह	–	शरीर, काया	चित्त	–	मन
नित्य	–	दररोज, नेहमी	कामना	–	इच्छा
दुर्बल	–	अशक्त	सद्‌भावना	–	चांगली भावना
आराधना	–	पूजा			

अभ्यास

अ. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिही.

1. नित्य कोणती आराधना झाली पाहिजे?
2. दुःख कोणाचे जावो असे कविला वाटते?
3. वेदना जाणावयाला काय केले पाहिजे?
4. मानवाच्या जीवनाला कशाचा वेध लागला पाहिजे?
5. एकतेची कल्पना पूर्ण होण्यास काय विसरले पाहिजे?

आ. खालील कवितेच्या ओळी पूर्ण कर.

1. दुःखितांचे _____
   _____
   _____
   _____ आराधना

2. भेद सारे _____
   _____
   _____
   _____ आराधना

इ. खालील प्रश्नांची दोन तीन वाक्यात उत्तरे लिही.

1. दुःखितांच्या वेदना दूर करण्यास काय काय केले पाहिजे असे कवीला वाटते?
2. मानवाचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन कसा असला पाहिजे?

© MTBS NOT TO BE REPUBLISHED

3. बंधुत्वाची भावना दृढ करण्यास काय केले पाहिजे?

4. एखादा गरीब विद्यार्थी तुझ्या वर्गात असल्यास तू त्याला कशाप्रकारे मदत करशील ?

ई. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिही.

1. मंदिर – 2. शौर्य –

3. कामना – 4. वैर –

5. नित्य –

उ. खालील शब्दांचे विरूद्धार्थी शब्द लिही.

1. नित्य ˆ 2. सुंदर ˆ

3. मंगल ˆ 4. अंतरंग ˆ

5. मुक्त ˆ 6. दुर्बल ˆ

ऊ. वर्गात/शाळेत एकात्मता साधण्यासाठी तू कोणते प्रयत्न करशील? मित्रांशी चर्चा कर व लिही.

1.


2.

3.

4.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

ए. खालील चक्र कवितेतील शब्दांचा वापर करून पूर्ण कर.



1. प्रार्थना
2.
3.
4.
5.
6.
7.
8.

ऐ. वेगवेगळी वेषभूषा करून हे गीत सांस्कृतिक कार्यक्रमात सादर करा.

* **उपक्रम** – साने गुरूजींची 'खरा तो एकची धर्म' कविता मिळवून वाच.
* **हे असेच लिही** - ओम्कार, घनशाम, मनःकामना, अदिती.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

2. वीर राणी चन्नम्मा

उमद्या अरबी घोड्यावर मांड ठोकलेली आहे. हातात तलवार धरलेली आहे. युद्धाच्या अशा पवित्र्यात असलेला चन्नम्माचा पुतळा पाहिला की ऊर अभिमानाने भरून येतो.

इ.स.1778 साली बेळगावी जिल्ह्यातील काकती येथील देसायांच्या घरी चन्नम्माचा जन्म झाला. वडिलांच्या देखरेखीखाली चन्नम्माने मराठी, कन्नड, उर्दू भाषांचा अभ्यास केला. रामायण, महाभारत, बसवपुराणासारखे पौराणिक ग्रंथ तिने वाचले होते. राज्यकारभाराचे ज्ञानही तिला मिळाले होते.



NOT TO BE REPUBLISHED

याखेरीज घोडयावर बसणे, पोहणे, भाला फेकणे, दांडपट्टा फिरविणे या कलेत लहानपणीच तरबेज झाली होती. सुंदर आणि गुणसंपन्न चन्नम्माचे लग्न कित्तूर संस्थानचा राजा मल्लसर्ज यांच्याशी झाले. मल्लसर्जाने आपल्या उत्तम गुणांनी कित्तूरच्या प्रजेचे प्रेम मिळविले होते. त्याने लोकांच्या हितासाठी तळी, कालवे, विहीरी, रस्ते बांधले होते.

इ.स. 1816 मध्ये राजा मल्लसर्ज एकाएकी निधन पावला. त्यानंतर चन्नम्माला अनेक संकटाना तोंड द्यावे लागले. आता राज्याचा राजकारभार चन्नम्माच पाहत होती. राज्यकारभारासाठी राणीने एका मुलाला दत्तक घेतल्याचे थॅकरेला समजले. थॅकरे हा त्यावेळी धारवाडचा कलेक्टर होता. इंग्रज सरकारच्या वतीने तो संस्थानच्या राज्यकारभारावर लक्ष ठेवीत असे. कित्तूरच्या खजिन्यावर त्याची दृष्टी होती. मोठे सैन्य घेऊन थॅकरे कित्तूरजवळ ठाण मांडून बसला. राणी चन्नम्माला हे रूचले नाही. तिच्या सरदाराना चीड आली. थॅकरेच्या पत्राला राणीने उत्तरच पाठविले नाही. त्यामुळे थॅकरेला राग आला. कित्तूरच्या किल्ल्यातील सर्व हालचालींची माहिती मिळण्यासाठी त्याने गुप्तहेर नेमले. किल्ल्यावर हल्ला करण्याची त्याने तयारी केली. राणीला ही बातमी कळताच किल्ल्याच्या रक्षणाची तिने सर्व तयारी केली.

राणीने आपल्या प्रजेची व सैनिकांची सभा घेतली. ''कोणत्याही परिस्थितीस



@KTBS TO BE REPUBLISHED

तोंड देण्यास तयार रहा'' असा तिने सर्वाना हुकुम दिला. चन्नम्मा ही सर्व प्रजेला प्रिय होती. कित्तूर संस्थान स्वतंत्र ठेवण्याचा सर्वांनी निश्चय केला.

ही बातमी समजताच थॅकरेच्या सैन्याने किल्ल्याचे दरवाजे मोडून आत प्रवेश केला. लढाईला तोंड फुटले. राणी चन्नम्मा किल्ल्याच्या तटावर उभे राहून हुकूम देत होती. राणीच्या करारी बाण्यामुळे सैन्याला चेव व स्फूर्ती आली. तिच्या बाजूला अंगरक्षक सय्यद बाळासाहेब उभा होता. ''हर हर महादेव'' च्या गर्जनेने व ढोल नगाऱ्यांच्या आवाजाने सर्व दिशा दुमदुमू लागल्या.

राणीचे सैन्य मोठ्या निकराने लढले. इंग्रजांचा सेनापती व इतर अधिकारी मारले गेले. हे पाहून थॅकरेच्या सैन्याने माघार घेतली. इंग्रज अधिकाऱ्यांना राणीने कैद केले. हे समजताच थॅकरे स्वतः घोड्यावर बसून राणीच्या सैन्यावर तूटून पडला. थॅकरेला पाहताच चन्नम्माने आपला रक्षक बाळासाहेब यास थॅकरेवर गोळी झाडण्याचा हुकूम दिला, व क्षणात थॅकरे जमीनीवर कोसळला. त्याचे शीर भाल्याच्या टोकावर ठेऊन किल्ल्याभोवती फिरविले. पुष्कळ इंग्रज अधिकारी कैदी झाले, पण त्या सर्वांना चन्नम्माने चांगली वागणूक दिली. चन्नम्माच्या साहसाची कित्तूरच्या प्रजेने फारच स्तुती केली.

थॅकरेच्या मरणाची बातमी मुंबईच्या इंग्रज अधिकाऱ्यांना कळताच पराभवाचा सूड घेण्याचा त्यांनी निश्चय केला. मोठे सैन्य त्यांनी कित्तूरला पाठविले. ही बातमी चन्नम्माला कळाली. काही झाले तरी इंग्रजाना शरण जायचे नाही असे ठरवून तिने युद्धाची तयारी केली. पण इंग्रजांचे सैन्य मोठे होते. तरी पण ती डगमगली नाही. तिने व तिच्या सैन्याने लढण्याची पराकाष्टा केली. पण शेवटी इंग्रजानी किल्ला सर केला.

राणीसह तिच्या सेनापतीस व इतर लोकास कैद केले. तिचा सेनापती गुरू सिद्धप्पास त्यानी फाशी दिले. राणी व तिच्या परिवारास कैद करून बैलहोंगल येथे वर्षासन देऊन नजर कैदेत ठेवले. त्यानंतर राणीने आपला शूर सरदार संगोळी रायण्णा याच्या मदतीने तेथून सुटून जाण्याचा दोनदा प्रयत्न केला. पण त्यात यश

NOT TO BE REPUBLISHED

आले नाही. फितूरीने सेनापती रायण्णाही पकडला गेला. शेवटी त्यालाही नंदगड येथे फाशी देण्यात आली. कैदेतून सुटण्याची राणीची आशा मावळली. त्यानंतर तिच्यावर इंग्रजांनी अतिशय कडक नजर ठेवली. तिने आपले शेवटचे दिवस एकांतात घालविले.

स्वातंत्र्यासाठी इंग्रजाविरुद्ध लढणारी कर्नाटकाची वीर महिला म्हणून चन्नम्मा प्रसिद्धीस आली. आपल्या देशाच्या इतिहासात तिचे नाव चिरस्मरणीय झाले आहे.

नवीन शब्दार्थ

उमदा – देखणा

मांड – घट्टबैठक

तरबेज – प्रवीण

कलेक्टर – उच्च अधिकारी

गुप्तहेर – नकळत बातम्या काढणारा

वर्षाव – वृष्टी

सूड – मनातला राग

चिरस्मरणीय – सतत आठवणीत राहणारे

रक्षक – रक्षण करणार

शरण – हार पत्करणे

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

अभ्यास

अ. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिही.

1. राणी चन्नम्माचा जन्म केव्हा व कोठे झाला?
2. चन्नम्मा कोणकोणत्या विद्येत निपुण होती?
3. राजा मल्लसर्जाचे निधन केव्हा झाले?

4. धारवाडचा कलेक्टर कोण होता?
5. राणीने थॅकरेच्या पत्राला उत्तर का पाठविले नाही?
6. राणी चन्नम्माचा अंगरक्षक कोण होता?
7. गुरूसिद्धप्पास कोणती शिक्षा दिली?
8. राणीने आपले शेवटचे दिवस कसे घालविले?

आ. अर्थ सांगून वाक्यात उपयोग कर.

1. हित जोपासणे.
2. ठाण मांडणे.
3. तोंड देणे.
4. चेव चढणे.
5. माघार घेणे.
6. ऊर भरून येणे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

इ. रिकाम्या जागी योग्य शब्द भर.

1. चन्नम्मा _____ आणि _____ होती.
2. थॅकरेच्या पत्राला राणीने _____ पाठविले नाही.
3. मल्लसर्जाने आपल्या उत्तम _____ कित्तूरच्या प्रजेचे प्रेम मिळविले.

4. राणीच्या करारी बाण्यामुळे सैन्याला चेव व _____ आली.

5. चन्नम्माला _____ येथे कैदेत ठेवले.

ई. योग्य जोड्या जुळव.

अ	ब
1. संगोळी रायण्णा	राजा
2. चन्नम्मा	सरदार
3. थॅकरे	कलेक्टर
4. सय्यद बाळासाहेब	राणी
5. मल्लसर्ज	अंगरक्षक

उ. विरुद्धार्थी शब्द लिही.

1. प्रिय ^

2. सुप्रसिद्ध ^

3. विस्मरण ^

4. स्तुती ^

ऊ. कोणी, कोणास म्हटले ते सांग.

1. ''कोणत्याही परिस्थितीस तोंड देण्यास तयार रहा.''

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

ए. दोन तीन वाक्यात उत्तरे लिही.

1. राजा मल्लसर्ज प्रजेला करा प्रिय वाटत असे ?
2. थॅकरेचा मुख्य हेतु काय होता ?
3. सैन्याला लढण्याची स्फूर्ती राणी कशी देत होती ?
4. राणीचे साहस कोणत्या प्रसंगातून दिसून येते?
5. राणी व सैन्यास कोणकोणती शिक्षा झाली?

ऐ. झाशीची राणी लक्ष्मीबाई यांची कथा वाच व शिक्षकांकडून समजून घे.

ओ. शूरवीर महिला योध्यांची चरित्रे शिक्षकांच्याकडून मिळवून वाच.

औ. इंग्रजाविरूद्ध आणखी कोण कोण लढले ते शिक्षक/पालकांच्याकडून समजून घे.

@KYBS NOT TO BE REPUBLISHED

उपक्रम

* शूर या शब्दाचा समानार्थी शब्द.

* राजा या शब्दाचे लिंग बदला.

* कर्नाटकातील स्वातंत्र्यवीर महिला

* वरील शब्द एकत्र करून तयार होणारे पाठाचे शीर्षक शोध व लिही.

हे असेच लिही–

अधीन, तत्त्व, दासत्व, दुरवस्था, सूचना

व्याकरण

वर्ण

आपण भाषा शिकताना खालील प्रमाणे मुळाक्षरे आधी शिकलो. त्यांचा आपण सविस्तर अभ्यास करू.

स्वर

अ आ इ ई उ ऊ ऋ ऌ ए ऐ ओ औ अं अः

व्यंजन

क	ख	ग	घ	ङ	च	छ	ज	झ	ञ
ट	ठ	ड	ढ	ण	त	थ	द	ध	न
प	फ	ब	भ	म	य	र	ल	व	श
		ष	स	ह	ळ	क्ष	ज्ञ		

स्वर 12 आहेत

स्वरांचे तीन प्रकार आहेत.

1) ऱ्हस्व स्वर 2) दीर्घ स्वर 3) संयुक्त स्वर

→अ, इ, उ, ऋ, ऌ हे ऱ्हस्व स्वर आहेत.

→आ, ई, ऊ हे दीर्घ स्वर आहेत.

→ए, ऐ, ओ, औ हे संयुक्त स्वर आहेत.

→अं व अः याना स्वरादी म्हणतात.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

खाली दिलेल्या संयुक्त स्वरांच्या उत्पत्ती बद्दल जाणून घे.

अ+इ=ए	अ+ई=ए
आ+इ=ऐ	आ+ई=ऐ
अ+उ=ओ	अ+ऊ=ओ
आ+उ=औ	आ+ऊ=औ

दोन स्वर एकत्र आल्याने बनणाऱ्या तिसऱ्या स्वराला संयुक्त स्वर म्हणतात.



NOT TO BE REPUBLISHED © BSBS

3. निसर्गातील चमत्कार : वीज

A1S8E5

ग्रीष्मातल्या लाही लाही करणाऱ्या एखाद्या दुपारीच सगळं आकाश काळ्याभोर, जडशीळ ढगांनी भरून जातं. सगळीकडे अंधारून येतं, व बघता बघता पावसाच्या टपोऱ्या थेंबांचा ताशा वाजायला सुरूवात होते.

आकाशात लखलखीत नागमोडी ट्यूबलाईट क्षणभर चमकते आणि प्रचंड आवाज होतो. गारांचा पांढरा शुभ्र सडा पडायला लागतो. कशाचा बरं असतो हा लखलखाट! कशी निर्माण होते बरं ही वीज. चला तर मग आज या विजेबद्दल अधिक माहिती मिळवूया.



NOT TO BE REPUBLISHED

पावसाच्या तांडव नृत्यातूनच ढगांचा प्रचंड कडकडाट होतो. त्याच्या अगोदर काही सेकंद आकाश लखलखत्या प्रकाशाने भरून जातं. प्रकाशाच्या लखलखीत नागमोडी रेखा काही सेकंदभर डोळ्यासमोर चमकून नाहीशा होतात.

निसर्गातील ही वीज निर्माण होताना सर्वप्रथम वाफेपासून तयार झालेले ढग जसजसे आकाराने व वजनाने वाढू लागतात, तसतसा त्यांच्यावर विद्युतभार जमायला लागतो. पृथ्वीवर देखील विद्युतभार असतोच. मात्र हा विद्युतभार ढगावर असलेल्या विद्युतभाराच्या बरोबर उलट असतो. विरुद्ध जातीच्या विद्युत भारात आकर्षण होते. आणि वीज निर्माण होते. त्यामुळे प्रकाश, ध्वनी व प्रचंड उष्णता निर्माण होते.

पावसाळ्यात मोठ्या संख्येने, मोठ्या प्रमाणात ढग तयार होत असतात. त्यामुळे या ढगावरील विद्युतभारही मोठ्या प्रमाणात वाढत जातो. या वेळेस ढगांच्या वरच्या भागावर धन विद्युतभार (पॉझीटीव्ह) तर खालच्या भागावर ऋण विद्युतभार (निगेटीव्ह) आजूबाजूच्या वातावरणात फेकला जातो. त्यामुळे ढगावरच्या विद्युत भारात व पृथ्वीवरच्या विद्युतभारात अंतर पडायला लागते. धन आणि ऋण विद्युतभार नेहमीच एकमेकाकडे आकर्षित होत असतात. परंतू या ठिकाणी या दोन्ही भारामध्ये अंतर पडल्यामुळे त्यांची एकमेकाजवळ जाण्याची धडपड वाढायला लागते.

या धडपडीमधूनच एक वेळ अशी येते की विद्युत भारामधील अंतर वाढलं की, ढगामधून इलेक्ट्रॉन्सचा एक प्रवाह वाहू लागतो. हा प्रवाह साधारणपणे 1 ते 4 इंच रूंद व 100 ते 150 फूट लांब अशाप्रकारचा एक विद्युतरस्ता तयार करतो. याच्यातच पुढे-पुढे याला सारखेच अनेक प्रवाह मिसळतात. हे एकात एक मिसळलेले प्रवाह ढगापासून पृथ्वीपर्यंत एक लांबच लांब असा विद्युतरस्ता तयार करतात.

हा विद्युतरस्ता नागमोडी असतो. अशा या रस्त्यामध्ये पृथ्वी व ढग ही दोन्ही टोकं धरली आणि या दोन टोकामधील विद्युत भारामध्ये शंभर दशलक्ष व्होल्टस् इतका फरक झाला की आकाशात आपण पावसाळ्यात नेहमी बघतो ती वीज चमकते.

आपल्या लवलवत्या अंगकाठीने आकाशभर नृत्य करणारी ही वीज फक्त $\frac{1}{500}$

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

ते $\frac{1}{100}$ सेकंद एवढ्या कमी वेळात निर्माण होऊन नाहीशीही होते. पापणी लवायच्या आत ही तेजोलता आकाश झळाळून लुप्त होऊन जाते. म्हणूनच संस्कृत भाषेत वीजेला चंचला, चपला असे संबोधतात.

जेव्हा वीजा कडाडत, चमकत असतात, तेव्हा त्या निरनिराळ्या आकारात, प्रकारात, दिसत असतात. यावरून विजेचे वेगवेगळे प्रकार पडतात. ते असे, पहिला प्रकार म्हणजे 'फीत विद्युत' यालाच इंग्लीश मध्ये रिबन लाईटनिंग असे म्हणतात. दुसरा प्रकार ''फोर्कड लाईटनिंग'', तिसरा प्रकार ''टुलई विद्युत'' किंवा कार्पेट लाईटनिंग, चौथा प्रकार 'गोल विद्युत' किंवा बॉल लाईटनिंग, पाचवा प्रकार 'सेंट एल्मोची आग.'

आकाशीच्या या विजेचे नेहमी दिसणारे पण थोडेसे वेगळे प्रकार म्हणजे 'रेखा-विद्युत, रिबाऊंड लाईटनिंग, मणी विद्युत हे होत.

आपण आकाशात पांढऱ्याशुभ्र रंगाची वीज चमकताना पाहतो. पण तांबड्या, हिरव्या, पोपटी, पिवळ्या, निळ्या अशा वेगवेगळ्या वीजा अनेकांनी बघितल्या आहेत. इंग्लडमध्ये तर अनेकवेळा निळी वीज चमकते. विजा रंगीत दिसण्याचे कारण म्हणजे वातावरणात अनेक वायू असतात. या वायूमध्ये विद्युतप्रवाहाचं विसर्जन झाल्यामुळे त्या त्या वायूच्या गुणधर्माप्रमाणे त्यांचे अणू चमकायला लागतात आणि आपल्याला रंगीत वीजा दिसतात.

म्हणजेच नायट्रोजन वायूमध्ये वीज चमकल्यास ती तेजस्वी शुभ्र दिसते. ऑक्सीजन वा ओझोन मध्ये चमकल्यास निळ्या रंगाची दिसते. हैड्रोजन वायूत वीज चमकल्यास ती लालभडक किंवा गुलाबी रंगाची दिसते. वातावरणात धूळ जास्त असल्यास पिवळ्या किंवा नारंगी रंगाच्या विजा चमकतात.

NOT TO BE REPUBLISHED © KTRS

विजेचे विद्युत-पट्ट्यामध्ये वहन होत असते. हे वहन होत असताना वीज प्रथम ज्या गोष्टी विजेच्या सुवाहक आहेत, तिथेच खेचली जाते आणि त्याचा परिणाम म्हणजे या मार्गात आडव्या येणाऱ्या ज्या गोष्टी त्याना तडाखे बसण्यात होतो. या मार्गाबाहेर ज्या वस्तू आहेत त्यांना अजिबात धक्का पोहचत नाही.

विजेचा फटका तलावात पोहणारी माणसं, गोल्फ खेळणारे खेळाडू यांना फार लवकर बसतो. कारण वीज पाणी, सर्वात उंच वस्तू, धातूची वस्तू याकडे आकर्षिली जाते. तसेच ज्या गोष्टी जमिनीचा पृष्ठभाग खूप मोठ्या प्रमाणात व्यापतात त्याकडे वीज उंच वस्तू पेक्षाही लवकर आकर्षिते. तसेच काळ्या किंवा भडक रंगाकडेही वीज आकर्षिली जाते.

विजेबद्दलच्या काही गैरसमजूती आहेत, त्या म्हणजे वीज फक्त पावसाळ्यातच चमकते, वीज आकाशातूनच खाली येते, वाळवंटात वीज पडत नाही, एकाच ठिकाणी वीज पुन्हा पुन्हा पडत नाही, विजेचा तडाखा बसल्यानंतर कोणी जिवंत रहात नाही.

आकाशातल्या विजेच्या चमत्कारांची माहिती आपण समजून घेतली म्हणजे या वेळच्या पावसाळ्यात जेव्हा तुमची आणि विजेची भेट होईल (अर्थात लांबूनच) तेव्हा ही वीज तुम्हाला खूपच जवळची वाटेल, हो ना?

निसर्गातील या विजेचा वापर अद्याप मानवाने करून घेतला नाही, पण कृत्रीम विजेचा शोध लावला आहे. या कृत्रिम विजेलाच 'विद्युत उर्जा' असेही म्हणतात. ही विद्युत उर्जा पाण्यापासून, वाऱ्यापासून, इंधनापासून मिळविली जाते. सूर्यापासून मिळणाऱ्या उर्जेला सौर उर्जा असे म्हणतात. मानवाने विद्युत व सौर उर्जेचा उपयोग आपल्या भौतिक विकासासाठी केला आहे.

© KIRS NOT TO BE REPUBLISHED

नवीन शब्दार्थ-

ताशा	–	एक वाद्य	विद्युत	–	वीज
नृत्य	–	नाच	लुप्त होणे	–	नाहीशी होणे
नागमोडी	–	वेडीवाकडी			

वाच व समजून घे.

1. रिबन लाईटनिंग (फीत विद्युत) →

वीज चमकत असताना जर वाऱ्यामुळे ढग हलला, तर हा विद्युत पथही हलायला लागतो. हा विद्युत पथ एखाद्या रिबीनीच्या फितीसारखा जाड दिसतो. म्हणून अशा विजेला रिबन लाईटनिंग (फीत विद्युत) असे म्हणतात.

2. फोर्कड् लाईटनिंग →

जेव्हा मूळ विद्युत मार्गाला एक दोन शाखा फुटतात. तेव्हा अशा विजेला फोर्कड् लाईटनिंग असे म्हणतात.

3. कार्पेट लाईटनिंग →

साधारणपणे 5% ढगावर नेहमीपेक्षा उलट विद्युतभार तयार होतो. वाऱ्याच्या झोतामुळे असे ढग जर आकाशातून इकडून तिकडे फिरायला लागले आणि त्याच वेळेस जर त्यांच्यावरचा विद्युतभार नाहीसा होऊन वीज चमकली तर संपूर्ण ढग प्रकाशाने झगमगून उठतो. काही सेकंदात रात्रीच्या काळोखात सुद्धा लख्ख प्रकाश पडून जातो. त्यावेळी आकाशाने एखादी तेजस्वी दुलई पांघरली की काय असे वाटते म्हणून विजेच्या या प्रकाराला **कार्पेट लाईटनिंग** (दुलई-विद्युत) असे म्हणतात.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

4. बॉल लाईटनिंग →

या प्रकारात 2 इंच व्यासाइतके छोटे छोटे विद्युतभारीत गोल निर्माण होतात. कधी कधी तर हे गोल तीस चाळीस फूट व्यासा इतके भल्या मोठ्या आकाराचे असतात. विजेचा चमचमाट झाला की त्यानंतर ते जरा वेळाने वातावरणात घसरून येतात हे गोल सोनेरी, निळे, हिरवे, जांभळे, लाल, पिवळे, पांढऱ्याशुभ्र रंगाचे असतात. हे गोल खूप वेळ वातावरणात रहात नाहीत. बऱ्याच वेळा त्यांचा स्फोट होऊन हवेत गंधकासारखा वास दरवळतो.

5. सेंट एल्मोची आग →

पाश्चात्य कोळ्यांची एक श्रध्दा आहे की एल्मो हा संत कोळी लोकांचा पाठीराखा आहे. हा अंधारात नावाड्याना मार्ग दाखवितो. तर वादळात त्यांचं रक्षण करतो. आणि म्हणूनच वादळात स्वतः संत एल्मो या ज्योती पेटवून कोळ्याना मार्गदर्शन करून त्यांचं रक्षण करतो.

दुसरे कारण हा विद्युत प्रकार टी.व्ही. च्या अँटीनावर, चर्च वा मंदिर यांच्या कळसावर, रेडिओच्या एरियल्सवर अर्धवट वा पूर्ण झालेल्या बांधकामाच्या तीक्ष्ण टोकावर, इमारतीवर लावलेल्या उंच विद्युत निवारकावर, डोंगरमाथा, झाडाझुडपांचे शेंडे, बोटींच्या डोलकाठ्यावर ज्योतीच्या रूपात तेवताना दिसतो. एकेक ज्योत सुमारे पाच ते दहा मिनीटे तेवते.

गोल विद्युत सारखीच सेंट एल्मोची आग फक्त रात्रीच दिसते.

© KTRS NOT TO BE REPUBLISHED

अभ्यास

अ. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिही.

1. आकाशात चमकणारी वीज कोणत्या वळणाची असते?
2. ढग कशापासून तयार होतात?
3. नेहमी एकमेकाकडे आकर्षिले जाणारे विद्युतभार कोणते?
4. ढगामधील इलेक्ट्रॉन्सचा प्रवाह किती रूंद असतो?

आ. खालील रिकाम्या जागी योग्य शब्द भर.

1. पावसाळ्यात ढगांच्यावर _____ विद्युतभार निर्माण होतो.
2. आकाशातील वीज _____ ते _____ या वेळेत निर्माण होते.
3. वीज _____ ते _____ फूट लांब विद्युतरस्ता तयार करते.
4. निळ्या रंगाची वीज _____ व _____ मध्ये चमकल्यास दिसते.
5. सुर्यापासून मिळणाऱ्या उर्जेला _____ असे म्हणतात.

इ. खालील प्रश्नांची 2-3 वाक्यात उत्तरे लिही.

1. वीज कशी निर्माण होते?
2. विजेचे प्रकार किती व कोणते?
3. वीज कोणकोणत्या रंगात दिसते ?
4. वीज वेगवेगळ्या रंगात दिसण्याचे कारण कोणते?
5. विजेचे वहन कसे होते? त्याचा परिणाम काय होतो?
6. वीज जास्तीत जास्त कोठे आकर्षिली जाते?
7. विजेबद्दलच्या गैरसमजूती कोणत्या?
8. तूम्ही पाहिलेल्या विजेचे वर्णन कर.
9. विजेपासूनची सावधानता तुम्ही कशी बाळगाल?

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

ई. जरा डोके चालव.

खाली आपल्या देशातील प्रमुख अणू प्रकल्पांची गावे आणि ती असलेली राज्ये अशा जोड्या दिलेल्या आहेत. शिक्षकांच्या मदतीने ती राज्ये शोधून काढा. या अणू प्रकल्पातून आपल्याला लागणारी वीज निर्माण करतात.

	प्रकल्प	राज्य
1.	तारापूर	___ ___ ___ ष्ट्र
2.	लोहा	___ ___ स्था ___
3.	कल्पक्लम	ता ___ ___ ___ ___
4.	नरोरा	___ त्त ___ ___ दे ___
5.	काक्रापारा	___ ज ___ ___
6.	कैगा	___ र्ना ___ ___

उ. खालील चौकोनातील रिकाम्या जागा भर.

(या रिकाम्या जागा भरण्यासाठी तक्त्याखाली दिलेल्या वाक्यांची तुला मदत होईल.)

स			ती
	चा		ती
	रा		ती
ति			ती
		य	ती


1. ही विद्येची देवता आहे.
2. म्हणजेच नको ते उद्योग.
3. सर्कशीतील विदूषक करतो त्या.
4. आंध्रप्रदेशातील हा श्रीमंत देव आहे.
5. खेळाच्या तासाला मुलांना या कराव्या लागतात.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

* विजेच्या अधिक माहितीसाठी 'मानसी वैद्य' यांचे निसर्गातील चमत्कार : 'वीज आणि वादळ' हे पुस्तक मिळवून वाच.

* वीज चमकल्याचे दृष्य पहिल्यांदा दिसते, नंतर गडगडाट ऐकू येतो याचे कारण शिक्षकाकडून समजून घे.

* चमकणाऱ्या विजेचे चित्र रेखाट.



* **हे असेच लिही-**

अंधकार, आवतीभोवती, निरीक्षण, भोवताली.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

व्यंजने

व्यंजनांचा प्रत्येकी एक वर्ग आहे.

'क' वर्ग	क् ख् ग् घ् ङ्
'च' वर्ग	च् छ् ज् झ् ञ्
'ट' वर्ग	ट् ठ् ड् ढ् ण्
'त' वर्ग	त् थ् द् ध् न्
'प' वर्ग	प् फ् ब् भ् म्

कठोर वर्ण : क्, ख्, च्, छ्, ट्, ठ्, त्, थ्, प्, फ्, ही प्रत्येक वर्गातील पहिली दोन व्यंजने आणि श्, ष्, स् हे कठोर वर्ण म्हणून ओळखले जातात. यानाच अघोष वर्ण असेही म्हणतात.

मृदू वर्ण : सर्व स्वर आणि व्यंजनाच्या प्रत्येक वर्गातील शेवटची तीन व्यंजने ग्,घ्, ङ्; ज्, झ्, ञ्, ड्, ढ्, ण्, द्, ध्, न्, ब्, भ्, म् आणि य्, र्, ल्, व्, ह्, ळ् हे मृदू वर्ण म्हणून ओळखले जातात यानाच घोष वर्ण असेही म्हणतात.

अनुनासिक : मृदू वर्णातील ङ्, ञ्, ण्, न्, म्, यांना अनुनासिक वर्ण म्हणून ओळखले जाते.

अर्धस्वर : मृदू वर्णातील य्, र्, ल्, व् यांना अर्धस्वर किंवा अंतस्थ म्हणून ओळखले जाते.

उष्मे : कठोर वर्णातील श्, ष्, स् हे उष्मे म्हणून ओळखले जातात.

स्वतंत्र्य : मृदू वर्णातील 'ळ' हे स्वतंत्र आहे.

संयुक्त : क्ष् व ज्ञ याना संयुक्त व्यंजने म्हणतात.


* व्यंजनाचे पुन्हा दोन गट होतात.

अल्पप्राण व्यंजने : क्, ग्, ङ्; च्, ज्, ञ्, ट्, ड्, ण्, त्, द्, न्, प्, ब्, म्, य्, र्. ल्, व्, ळ् आणि अनुस्वार यांचा उच्चार करताना फुप्फुसातून येणाऱ्या हवेचे प्रमाण कमी असते. म्हणून त्यांना **अल्पप्राण व्यंजने** म्हणतात. ही वीस व्यंजने आहेत.

महाप्राण व्यंजने : ख्, घ्, छ्, झ्, ठ्, ढ्, थ्, ध्, फ्, भ्, स्, ष् आणि विसर्ग यांचा उच्चार करताना फुप्फुसातून येणाऱ्या हवेचे प्रमाण जास्त असते. म्हणून त्याना **महाप्राण व्यंजने** म्हणतात. ही चौदा आहेत.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

4 . पाऊस



पाऊस आला सवंगड्यानो, जलधारा पडती
झिम झिम जलधारा पडती ।।ध्रु।।

दर्यावरची लुटून दौलत, ढग डौलाने जाती डोलत
फुटून खजिना वाटेवरती, ओघळले मोती ।।1 ।।

गवताची तरतरीत पाती, पहा ओणवी होऊन न्हाती
आणि वाहता वारा बघती, थरथरून वरती ।। 2 ।।

कौलारूच्या आड सानुल्या, चिमणाताई दडून बसल्या
डोळे मिटूनी ध्यान कुणाचे, वळचणीत करती ।।3 ।।

बाग बघा हा बहरून गेला, पानोपानी नवा तजेला
लेवून बसली हिरवा शेला, जणु अंगावरती ।।4 ।।

गुलाब कलिका गोजीरवाणी, सर्व फुलांची ही तर राणी
घेता अंगावरती पाणी, कशी फुले बघती ।।5 ।।

हासू खेळू नाचू या रे, भिजू पावसामध्ये सारे
फुलाप्रमाणे झेलून घेऊ, जलबिंदू हाती ।।6 ।।

पाऊस पडता पण कोसळुनी, कडाडता ढग जाऊ पळूनी
पंख झाडूनी जशी पाखरे, घराकडे उडती ।।7 ।।

-संकलित

NOT TO BE REPUBLISHED

नवीन शब्दार्थ-

दर्या – समुद्र दौलत – वैभव

ओणवी – वाकलेली जलबिंदू – पाण्याचा थेंब

वळचण – घराच्या कौलांच्या आत वळलेली जागा. (जिथे चिमण्या-सारखे छोटे पक्षी सुरक्षित बसू शकतात.)

जलधारा – पावसाच्या धारा कलिका – कळी

अभ्यास

अ. खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

1. दर्यावरची दौलत कोण लुटून नेत आहे?
2. मोती केंव्हा ओघळतात?
3. गवताची पाती कशी न्हात आहेत?
4. चिमणी कोठे दडून बसते?
5. बाग बहरल्यामुळे काय झाले?
6. गुलाब कलिका कुणाची राणी आहे?

आ. असे कविने का म्हटले ते सांग.

1. फुटून खजिना वाटेवरती, ओघळले मोती.
2. गवताची तरतरीत पाती, पहा ओणवी होऊनी न्हाती.
3. डोळे मिटूनी ध्यान कुणाचे, वळचणीत करती.
4. लेवून बसली हिरवा शेला, जणू अंगावरती.

इ. समानार्थी शब्द लिही.

जल – ढग –

वारा – पाखरे –

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

ई. जोडशब्द बनव

जसे – पानोपानी

कपडा – जमीन –

धन – भाजी –

सोने – पाऊस –

उ. खालील ओळींचा अर्थ स्पष्ट कर.

1. हासू खेळू नाचू यारे, भिजू पावसामध्ये सारे।
   फुलाप्रमाणे झेलून घेऊ, जलबिंदू हाती।।

ऊ. खालील अर्थाचे कवितेत आलेले शब्द लिही

पाने – कळी –

अंघोळ – पुष्प –

लपणे – खग –

ए. 'पावसाळा' या विषयावर 10 ते 15 ओळी निबंध लिही.

ऐ. उदाहरणार्थ दाखविल्याप्रमाणे मूळ शब्द ओळख.

दर्यावरची – दर्या

कौलारूच्या – वळचणीत –

घराकडे – वाटेवरती –

✻ **उपक्रम** - पावसा संबंधीच्या कविता मिळवून त्यांचा संग्रह कर.

✻ **हे असेच लिही** - अकराळ – विकराळ, सुरूवात, मुकुट, नावीन्य.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED



5. बुद्धिबळ

D1Q3Q2

मानवाच्या जीवनात खेळाचे अनन्य साधारण महत्व आहे. खेळ हे करमणुकीचे साधन आहे. खेळामुळे सहनशिलता, एकता, सहकार्य, सांघिक भावना, निर्णय क्षमता, युक्ती हे गुण सहज वाढीस लागतात. खेळामुळेच शरीर सुदृढ बनते. मानवी विचारांना सुयोग्य पद्धतीने वाटचाल करण्याचे मार्गदर्शन खेळच करतात.

अशा या खेळांचे प्रमुख दोन प्रकार आहेत. पहिला प्रकार म्हणजे मैदानी खेळ होय. यामध्ये कबड्डी, खो-खो, क्रि केट, हॉकी, फुटबॉल यासारखे खेळ खेळले जातात. दुसरा प्रकार म्हणजे बैठे खेळ होय. यामध्ये सारीपाट, कॅरम, बुद्धिबळ इत्यादी खेळ येतात. आज आपण बैठ्या खेळातील 'बुद्धिबळ' या खेळाविषयी अधिक माहिती मिळवूया.

बुद्धिबळ या खेळालाच 'शतरंज असे म्हणतात. 'शतरंज हा शब्द चतुरंग' या संस्कृत शब्दापासून तयार झालेला आहे. त्यामुळे हिंदुस्थान हेच या खेळाचे उगमस्थान ठरते.

बुद्धिबळाचा हा खेळ चार-पाच हजार वर्षापासून हिंदुस्थानात चालू आहे. ज्यावेळी श्रीरामचंद्रानी लंकेस आपल्या सैन्यासह वेढा दिला. त्यावेळी रावणराजाची करमणूक करण्यासाठी त्याची राणी मंदोदरी हिने हा खेळ सुरू केला अशी दंतकथा आहे.

प्राचीन तज्ञ अरब ग्रंथकर्ता मसुदी याने इ.स. 950 च्या सुमारास या खेळाचा उगम फार प्राचीनतम काळापासून आहे असे लिहिले आहे. बुद्धिबळ हा खेळ हिंदुस्थानातून पर्शियात गेला असे अरबी व पर्शियन लेखक सांगतात. तेथून पुढे हा खेळ 8 व्या शतकात अरबस्थानात गेला. 11 व्या शतकात याचा प्रसार युरोपखंडात झाला.

बुद्धिबळाच्या खेळात जी सेना उपयोगात आणली जाते ती चार प्रकारची असते. हत्ती, उंट, घोडे आणि पायदळ अशी चार अंगे या खेळात आहेत. यावरूनच या खेळास ''चतुरंग'' हे नांव मिळाले आहे.

@KTPS NOT TO BE REPUBLISHED

बुद्धिबळाच्या या खेळात दोन बाजूचे दोन राजे हे खरे प्रतिपक्षी होत. प्रत्येक राजाची चतुरंग सेना ही आपल्या राजाच्या कैवाराने प्रतिपक्षाच्या सेनेशी लढवायची असे या खेळाचे स्वरूप आहे. आपल्या राजाच्या संरक्षणार्थ हत्ती, घोडा, उंट, पायदळ (शिपाई) यापैकी कोणीही एकजण किंवा जरूर तर सारेही आपले बळी देऊन आपल्या राजाचे प्राण वाचवण्यास पाहतात. आणि त्याचवेळी प्रतिपक्षाच्या राजास पकडावयास पाहतात. त्याकरिता त्यांच्या ज्या ज्या हालचाली होतात त्यातूनच बुद्धिबळाचा डाव म्हणजे लुटू पुटू ची लढाई निर्माण होते. तसेच वजीराला या खेळात जादा सेनांग म्हणून घेतलेले आहे. प्रसंगी वजीर स्वतःचा बळी देऊन राजाचे रक्षण करतो.

हल्ली युरोप व अमेरिका खंडात बुद्धिबळाचे सामने चार प्रकारांनी खेळले जातात. 1. वैयक्तीक 2. नॉकाऊट 3. लीग पद्धत 4. सांघिक, यापैकी पहिले तीन प्रकार आपल्या देशात आढळून येतात. हल्ली जास्तीतजास्त लीग पद्धत कोणत्याही सामन्यात उपयोगात आणली जाते.

बुद्धिबळाचा हा खेळ स्थळाची मर्यादा, कालाची मर्यादा, व बळाची मर्यादा या तीन तत्वांना अनुसरून खेळावयाचा असतो. हा खेळ दोन व्यक्तीनी किंवा व्यक्ती समुहानी म्हणजेच दोन पक्षानी खेळावयाचा असतो. सारख्याच आकारमानाच्या 64 घरांचा एक पट खेळायला वापरतात. त्यात अनुक्रमे काळा व पांढरा असे रंग देऊन बत्तीस काळी व बत्तीस पांढरी घरे असतात.

प्रत्येक बाजूस 16 योद्धे असतात. दोन्ही बाजूंच्या योध्द्याना नावे सारखीच आणि त्यांच्या गती व शक्ती सारख्याच मानल्या आहेत. प्रत्येक बाजूच्या योध्दयात राजा हा प्रमुख मानलेला असून, एक वजीर (प्रधान), दोन घोडे, दोन उंट, दोन हत्ती, व आठ प्यादी असे सर्व मिळून एकूण 16 योद्धे असतात. या योद्धयांच्या

NOT TO BE REPUBLISHED @KTRS

दर्जावरून राजा, वजीर, उंट आणि घोडे या 8 योध्द्याना बुद्धिबळात मोहोरे अशी संज्ञा आहे. आणि 8 शिपायांना प्यादी अशी संज्ञा आहे.

पटावर मोहोऱ्यांची मांडणी करताना प्रत्येक खेळाडूने आपल्या उजव्या हाताच्या कोपऱ्यास पांढरे घर येईल अशा बेताने पट मांडावयाचा असतो. त्यानंतर आपल्या कडील बाजूच्या पहिल्या पट्टीवर आपले आठ मोहोरे व दुसऱ्या आडव्या पट्टीवर आठ प्यादी मांडावयाची असतात. दोन्ही पक्षांनी याप्रमाणे आपले मोहोरे व प्यादी मांडली म्हणजे दोन्ही पक्षांच्या मोहोऱ्यासमोर त्याच दर्जाचे मोहोरे मांडलेले असतात.

काळा

ह	घो	उं	व	रा	उं	घो	ह
सै	सै	सै	सै	सै	सै	सै	सै
सै	सै	सै	सै	सै	सै	सै	सै
ह	घो	उं	व	रा	उं	घो	ह

पांढरा

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

पहिल्या आडव्या पट्टीवर उजव्या बाजूला सर्वप्रथम हत्ती, घोडा, उंट, राजा, वजीर, उंट, घोडा, हत्ती अशी मांडणी असते. म्हणजेच एका पक्षाच्या राजासमोर प्रतिपक्षाचा राजा असतो.

या खेळात पांढऱ्या मोहोऱ्याचा खेळाडू सर्वप्रथम खेळाला सुरूवात करतो. प्रत्येक खेळाडूने एकावेळी एकाच मोहोऱ्याची हालचाल करावयाची असते.

बुद्धिबळातील खेळी

1. **प्यादे** - हे एकावेळी एक घर पुढे जाते. मात्र प्रतिपक्षाचे मोहरे मारताना त्याला एक घर तिरपी चाल घ्यावी लागते. सुरूवातीला प्याद्याला मूळ घरातून एकवार 2 घरे समोर चालण्याचा हक्क आहे. प्यादे एकदा पुढे सरकावल्यास ते मागे येऊ शकत नाही. कोणतेही प्यादे आपल्या आठव्या घरी पोहचल्यास खेळणाऱ्याच्या इच्छेनुसार त्याचे कोणत्याही मोहोऱ्यात रूपांतर करून त्याच ठिकाणी ते खेळावयास घेता येते. दोन्ही पद्धतीत राजाच्या आठव्या घरी पोहोचलेल्या प्याद्याचा राजा होऊ शकत नाही.

2. **वजीर** - हा सर्व मोहोऱ्यामध्ये श्रेष्ठ दर्जाचा मोहरा असतो कारण वजीर उभा, आडवा किंवा तिरकस कसाही व कितीही घरे जाऊ शकतो. कारण त्याच्या अंगी उंटाचे व हत्तीचे सामर्थ्य एकवटलेले असते.

3. **हत्ती** - वजीराच्या खालोखाल महत्वाचा हा मोहरा आहे. याची चाल आडवी अगर उभ्या पट्टीतून सरळ रेषेत असते. हत्तीसमोरच्या उभ्या पट्टीत स्वपक्षाचे प्यादे नसल्यास तो हत्ती मोकळ्या पट्टीवर आहे असे म्हणतात. हत्ती व वजीर यांना मोठे मोहरे (major pieces) असे म्हणतात.

4. **उंट** - उंट नेहमी तिरकस जातो. उंटाचे मूळ घर काळे असेल तर तो नेहमी काळ्या घरातूनच संचार करतो. उंटाचे मूळ घर पांढरे असल्यास तो पांढऱ्या घरातूनच संचारतो. उंट, वजीर व हत्तीला एकाचवेळी कितीही घरे जायचे स्वातंत्र्य आहे.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

5. घोडा - घोड्याची गती उभ्या अथवा आडव्या पट्टीतील दोन घरे व त्यास काटकोन करून असणारे एक घर अशी अडीच घरे असते. एका घोडयाला आठ घरे ऐच्छिक असतात. अशा विलक्षण गतीमुळे घोडा मोहोऱ्याच्या किंवा प्याद्याच्या डोकीवरून पलीकडे उडी टाकू शकतो. हा हक्क इतर कोणत्याही मोहोऱ्यास नसतो. उंट व घोडे यांना लहान मोहरे (minor pieces) असे म्हणतात.

6. राजा - हा मोहरा मागे पुढे तिरकस कसाही, मात्र एका वेळेला एकच घर जातो.

बुद्धिबळ खेळणाऱ्याने खालील गोष्टी लक्षात घ्याव्यात.

1. जरूर तेवढया प्याद्यांच्या हालचाली करून आपले मोहरे हल्ल्यास अगर बचावास योग्य अशा ठिकाणी आणणे.
2. प्याद्यांच्या निरर्थक खेळ्या न खेळणे.
3. ठराविक वेळेत योग्य खेळी खेळणे.
4. एकाच वेळेला सर्व मोहोऱ्यांच्या खेळी लक्षात ठेवणे.

नवीन शब्दार्थ-

सहनशील – सोशिक

शतरंज – बुद्धिबळ या खेळाचे नाव

प्यादी – बुद्धिबळ या खेळातील सैनिक

मोहरे – राजा व प्यादी या व्यतिरीक्त बुद्धी बळातील दळे

वजीर – बुद्धिबळ या खेळातील प्रधान

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

अभ्यास

अ. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिही.

1. खेळांचे मुख्य प्रकार किती आहेत?
2. बुद्धिबळ हा कोणत्या प्रकारचा खेळ आहे?
3. बुद्धिबळ या खेळाला कोणत्या नावाने ओळखतात?
4. बुद्धिबळाची सुरूवात केव्हा झाली?
5. बुद्धिबळात किती प्रकारची सेना उपयोगात आणली जाते?
6. बुद्धिबळ या खेळाची सुरूवात कोण करतो?
7. उंटाची चाल कशी असते?
8. जागतिक स्तरावर भारताचे नाव उज्वल करणाऱ्या बुद्धिबळ खेळाडूंची नावे लिही

आ. खालील प्रश्नांची दोन तीन वाक्यात उत्तरे लिही.

1. बुद्धिबळ खेळामुळे कोणते गुण वाढीस लागतात?
2. बैठ्या खेळांची चार उदाहरणे लिही
3. मैदानी खेळांची चार उदाहरणे लिही
4. बुद्धिबळ या खेळाला चतुरंग असे का म्हणतात?
5. राजाचे रक्षण कोण कोण करतात?
6. बुद्धिबळाचे सामने कोणत्या प्रकारानी खेळले जातात?
7. पटावर मोहोऱ्यांची मांडणी कशी करतात?
8. प्याद्यांची चाल कशी असते?
9. बुद्धीबळातील सर्वश्रेष्ठ मोहोरा कोणता व का ?


©KTBS NOT TO BE REPUBLISHED

इ. खालील मोकळ्या जागा भर.

1. वजीराला _____ असेही म्हणतात.
2. पटाच्या प्रत्येक बाजूला _____ मोहोरे असतात.
3. बुद्धिबळाच्या पटावर _____ एवढी घरे असतात.
4. राजा, वजीर, उंट, घोडे या योध्द्यांना _____ अशी संज्ञा आहे.
5. मोहोऱ्यांच्या किंवा प्याद्यांच्या डोकीवरून _____ हा मोहोरा उडी मारून जाऊ शकतो.


ई. खालील मोहरे व त्यांची चाल यांच्या जोड्या जुळव.

मोहरे	चाल
1. प्यादे (सैनिक)	I. उभा, आडवा
2. उंट	II. उभा, शत्रूला मारताना तिरकस
3. घोडा	III. उभा, आडवा, तिरकस
4. हत्ती	IV. अडीच घरांची चाल
5. प्रधान	V. फक्त तिरकस



@KTBS NOT TO BE REPUBLISHED

उ. खाली दिलेल्या ग्राऊंडवर तू खेळत असलेल्या मैदानी खेळांची नावे लिही.



ऊ. खाली दिलेल्या दिवाणखाण्यात तू खेळत असलेल्या बैठया खेळांची नावे लिही.

ए. खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग कर.

1. घोडे मारणे –
2. बेत करणे –
3. मात करणे –
4. तोंड देणे –
5. चाल करणे –

ऐ. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिही.

1. करमणूक –
2. राजा –
3. प्रधान –
4. सामर्थ्य –
5. चतुरंग –

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

❊ **उपक्रम**

1. बुद्धिबळाचे नियम जाणकाराकडून समजून घे.
2. तुम्ही तुमच्या शाळेत खेळत असलेल्या खेळांची यादी करा.
3. तुमच्या शाळेने कोणकोणत्या खेळात प्राविण्य मिळविले आहे ?
4. आपल्या देशातील 4 बुद्धिबळ खेळाडूंची नांवे लिही.

❊ **शिक्षकांना सूचना** – तुमच्या शाळेत बुद्धिबळाच्या स्पर्धा आयोजीत करून मुलांना प्रोत्साहन द्या.

❊ **हे असेच लिही** – क्रीडांगण, तत्कालीन, मंत्रिमंडळ, साहाय्य.

वर्णांची उच्चारस्थाने


वर्णांचा उच्चार करताना मुखातील निरनिराळ्या भागांची मदत घ्यावी लागते. त्या भागाना स्थाने म्हणतात.

1. अ, आ, क्, ख्, ग्, घ्, ङ्, ह आणि विसर्गाचा उच्चार कंठ स्थानापासून होतो, त्यांना **कंठ्य** म्हणून ओळखतात.
2. इ, ई, च्, छ्, ज्, झ्, ञ् आणि श् यांचा उच्चार तालू स्थानापासून होतो, त्यांना **तालव्य** म्हणून ओळखतात.
3. ऋ, ट्, ठ्, ड्, ढ्, ण्, र्, ष्, आणि ळ् यांचा उच्चार मूर्धा स्थानापासून होतो, त्यांना **मूर्धन्य** म्हणून ओळखतात.
4. ऌ, त्, थ्, द्, ध्, न्, ल्, स् यांचा उच्चार दंत स्थानापासून होतो, त्यांना **दंत्य** म्हणून ओळखतात.

©KTRS NOT TO BE REPUBLISHED

1. जीभ
2. पडजीभ
3. कोमल तालू (कंठ)
4. मूर्धा
5. कठोर तालू (तालू)
6. वर्त्स (दंततालू)
7. दात
8. ओठ
9. नाक

म. तोंडाची पोकळी (मुखविवर)
न. नाकाची पोकळी (नासिकाविवर)
अ. अन्ननलिका
श्व. श्वासनलिका



5. उ, ऊ, प्, फ्, ब्, भ्, म् यांचा उच्चार ओष्ठ स्थानापासून होतो. त्यांना **ओष्ठय** म्हणून ओळखतात.

6. ङ्, ञ्, ण्, न्, म् आणि अनुस्वार यांचा उच्चार नासिका स्थानापासून होतो, त्यांना **अनुनासिक** म्हणून ओळखतात.

7. ए, ऐ यांचा उच्चार कंठ आणि तालू या दोन्ही स्थानापासून होतो. त्यांना **कंठ तालव्य** म्हणून ओळखतात.

8. ओ, औ यांचा उच्चार कंठ आणि ओष्ठ या दोन्ही स्थानापासून होतो त्यांना **कंठोष्ठ्य** म्हणून ओळखतात.

9. 'व्' याचा उच्चार दंत आणि ओष्ठय या दोन्ही स्थानापासून होतो. त्याला **दंतोष्ठ्य** म्हणून ओळखतात.

10. च्, ज्, झ्, यांचा उच्चार दंत आणि तालू या दोन्ही स्थानापासून होतो, त्यांना **दंत-तालव्य** म्हणून ओळखतात.

© KBPS NOT TO BE REPUBLISHED

– च्, ज्, झ् हे तीन वर्ण तालव्य आणि दंत तालव्य या दोन्ही गटात येतात कारण या वर्णांचे दोन-दोन उच्चार होतात.

तालव्य उच्चार	दंत तालव्य उच्चार
जय (ज्यय)	जग
जन (ज्यन)	जप
जल (ज्यल)	जावई
जग (ज्यग)	जड
जप (ज्यप)	जत्रा
जेवण (ज्येवण)	जमाव
चक्र (च्यक्र)	चाक
चंद्र (च्यंद्र)	चघळ
चरित्र (च्यरित्र)	चारा
झेल (झ्येल)	झाड
झकास (झ्यकास)	झरा

तालव्य शब्दातील उच्चार आणि दंततालव्य शब्दातील वर्णांचा उच्चार वेगळा असल्याने त्यांचा अर्थ देखिल बदलतो.

उदा. जग (ज्यग) = सृष्टी, विश्व

जग = जिवंत राहा.


जप (ज्यप)= देवाच्या नावाची किंवा एखाद्या मंत्राची पुन्हा पुन्हा केलेली आवृती.

जप = सांभाळ.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS


6. सत्यकाम

I4G1W2



प्राचीन काळात मुलांना शिक्षणासाठी ऋषीमुनींच्या आश्रमात तपोवनात पाठविले जायचे. एकदा काय झाले की, गौतम हरीद्रुमत ऋषींच्या आश्रमात जाबाली नावाची एक दासी आपला मुलगा सत्यकाम याला घेऊन आली. व तिने गौतम ऋषीना विनंती केली की त्यांनी आपल्या मुलाचा शिष्य म्हणून स्वीकार करावा. मोठ्या मनाने गौतमऋषीनी त्या दासीपुत्राला आपला शिष्य म्हणून स्वीकार केला.

सत्यकाम हा अत्यंत नम्र व कामसूवृत्तीचा होता. विद्याभ्यासाबरोबर त्याच्याकडे गाई चारण्याचे काम दिले होते. आपली जबाबदारी तो अत्यंत



© NCERT NOT TO BE REPUBLISHED

काळजीपूर्वक पार पाडायचा. सकाळी उठून विद्याभ्यास झाला की दिवसभर गाई घेऊन रानात जात असे. निसर्गाच्या सान्निध्यात घडणाऱ्या प्रत्येक घडामोडींचे बारीक सारिक गोष्टींचे अवलोकन तो करीत असे. रानात फिरताना सभोवताली दिसणाऱ्या डोंगर, दऱ्या, नदीनाले, झाडे, वेली, फुले, पांखरे, कृमी, कीटक या सर्वांचे तो बारकाईने निरीक्षण करीत असे.

बरीच वर्षे झाल्यानंतर गुरूजीना वाटले की सत्यकाम शिकला आहे. समाजात जीवन जगण्यासाठी त्याला कोणतीच अडचण येणार नाही. तेव्हा गौतम ऋषींनी त्याला घरी जाण्याची अनुमती दिली. तेव्हा इतर शिष्याना वाटले की याने तर फक्त गाई चारण्याचे ज्ञान मिळविले आहे. तेव्हा तो घरी जाऊन काय करील! पण गुरूजीना विश्वास होता.


सर्व शिष्यांसमोर सत्यकामाला 'गुरूजीनी प्रश्न विचारला की, सत्यकामा तू इतक्या वर्षात काय काय शिकलास ते सांगशिल का?

सत्यकाम बोलू लागला, गुरुवर्य आपण मला जे काम दिले होते ते मी मनापासून केले आहे. त्याच बरोबर या सभोवतालच्या निसर्गातील घटनांनी मला पोक्त बनविले. मला गाई चारताना या वृक्षानी स्वतः उन्हात राहून सावली दिली. त्यानी सहनशीलता व परोपकाराचे ज्ञान दिले. जंगलातून वाहणाऱ्या नदीने जीवनात सतत पुढे जाण्याचा मार्ग दिला. तिच्यामध्ये सर्वजण केरकचरा टाकतात. मात्र ती सर्वांना शुद्ध पाणी देण्याचा प्रयत्न करते. त्याप्रमाणे जीवनात समाजाकडून दुर्गुणांचा आघात झाला तरी सद्गुणाचे आचरण करण्यास शिकविले. इथे उभ्या असणाऱ्या डोंगरानी मला जीवनात येणाऱ्या संकटाना धैर्याने तोंड देण्यास शिकविले. वारूळातील मुंग्यानी जीवन जगण्याची दूरदृष्टी दिली. पुढे पावसाळ्याची चाहूल लागली की मुंग्या आपल्या धान्याचा साठा करतात व पावसाळ्यातील अन्नाची शिदोरी साठवून ठेवतात.

इथे फुलणारी फुले, आपल्या रंगाने, सुगंधाने चराचरांचे मन प्रफुल्लीत करतात. दुसऱ्यांना आनंद मिळावा हेच ती सुचवितात. किलबिलणारे पक्षी मुक्तपणे जीवन जगण्याचा मार्ग सुचवितात.

हे सर्व जीवन शिक्षण मी याच निसर्गाच्या सान्निध्यात राहून तुमच्या कृपाशीर्वादाने मिळविले आहे.

© SCERT NOT TO BE REPUBLISHED



हे सर्व ऐकून फक्त श्लोक पठणात मग्न राहून विद्याभ्यास करणाऱ्या मुलांना आश्चर्य वाटले. ती खजील झाली. सत्यकाम आपल्यापेक्षा श्रेष्ठ आहे हे त्यांना समजले. गुरूजीनी सत्यकामाला 'तुझे कल्याण होवो' असा आशीर्वाद दिला व घरी जाण्याची अनुमती दिली.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

नवीन शब्दार्थ

अनुमती	–	परवानगी, संमती	प्रफ्फुलित	–	टवटवीत
पोक्त	–	मोठा	खजील	–	शरमणे, लाजणे
दुर्गुण	–	वाईट गुण			
सद्‌गुण	–	चांगले गुण			
धैर्य	–	धाडस			
शिदोरी	–	अन्नाचा साठा			
चराचर	–	आवती भोवतीचा परिसर			
दूर दृष्टी	–	पुढचा विचार			

अभ्यास

अ. खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

1. सत्यकाम हा कोणाचा मुलगा होता?
2. गौतम ऋषीनी त्याच्यावर कोणते काम सोपविले होते?
3. सत्यकामाचा स्वभाव कसा होता?
4. सत्यकाम गायी राखताना काय करत असे ?
5. इतर शिष्य कोणत्या गोष्टीकडे अधिक लक्ष देत असत?

आ. खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

1. तू घरी करत असलेल्या कामांची यादी कर.
2. तुला माहित असलेल्या औषधी वनस्पती कोणत्या?
3. आंबटगोड फळांची नावे लिही.
4. पूर्ण गोड असलेली फळे कोणती?
5. पिवळ्या रंगाच्या फळांची नावे लिही.
6. हिरव्या रंगाच्या फळांची नावे लिही.
7. लाल रंगाची फळे कोणती?
8. तुझ्या परसात असणाऱ्या झाडांची लिही.

इ. पाठाच्या आधारे जोड्या जुळव.

	'अ'	'ब'
1.	झाडे	आनंद, सुगंध देतात.
2.	नदी	सतत क्रियाशील, दूरदृष्टीपणा ठेवते.
3.	डोंगर	स्वतः उन्हात राहून दुसऱ्यांना सावली देतात.

@KYBS NOT TO BE REPUBLISHED

4. फुले — जीवनात सतत पुढे जाण्याचा मार्ग शोधते.

5. मुंगी — संकटासमोर धैर्याने उभा राहतो.

ई. नमुन्याप्रमाणे जोडून येणारे शब्द शोधून लिही. उदा. डोंगर-दऱ्या.

नदी –
फुले –
पशू –
झाडे –
कृमी –
ऊन –

उ. विरुद्धार्थी शब्द लिही.

प्राचीन x
कामसू x
ज्ञान x
विश्वास x
प्रश्न x
उपकार x
शुद्ध x
सुगंध x

ऊ. उदाहरणाप्रमाणे लिही.

दुर्वांची – जुडी
फुलांची –
द्राक्षांचा –
फुलांचा –
केळ्यांचा –


ए. खालील शब्दांचा वाक्यात उपयोग कर.

विद्याभ्यास –
जबाबदारी –
निरीक्षण –
सहनशीलता –
धैर्य –

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

ऐ. खालील अर्थ वाचून ''स'' चा तारा पूर्ण कर.

अर्थ: 1. पूर्ण – सगळा
2. प्रभात – प्रातःकाळ
3. पौष्टिक – सत्वयुक्त
4. चित्रांनी – शोभीवंत केलेले
5. खोल – खोलगट
6. प्रामाणिकपणा



©KTBS NOT TO BE REPUBLISHED

❊ **उपक्रम**

* तुझ्या सभोवताली निसर्गात घडणाऱ्या अद्‌भूत घटनांची यादी कर.
* तुला आढळणाऱ्या रंगीबेरंगी फुलांची यादी कर.
* तुझ्या परिसरात आढळणाऱ्या पक्ष्यांची नावे लिही.

❊ **हे असेच लिही -** परीक्षा, उत्कृष्ट, कस्तूरी, नैर्ऋत्य.

जोडाक्षरे

❊ **खाली दिलेले शब्द वाच. त्यात अधोरेखित अक्षराचे निरीक्षण कर.**

गप्पा, हत्ती, शक्कल, अद्दल, पट्टण

वरील शब्दात एकच व्यंजन दोनदा जोडले आहे, व त्यात स्वर मिळविल्यास होणाऱ्या जोडाक्षरांना **द्वित्त** असे म्हणतात.

उदा : गप्पा = प् + प् + आ = प्पा

हत्ती = त् + त् + ई = त्ती

शक्कल = क् + क् + अ = क्क

अद्दल = द् + द् + अ = द्द

पट्टण = ट् + ट् + अ = ट्ट

स्वाध्याय – द्वित्त अक्षरे असलेली जोडाक्षरे लिही.

❊ **खाली दिलेले शब्द वाच त्यातील अधोरेखीत अक्षरांचे निरीक्षण कर.**

आमच्या, उद्या, कुत्रा, वास्तव, उत्सव

वरील शब्दात दोन व्यंजने एकत्र जोडली आहेत आणि त्यात स्वर मिसळल्यास त्यांना **संयुक्त व्यंजन** म्हणतात.

उदा : आमच्या – च् + य् + आ = च्या

उद्या – द् + य् + आ = द्या

कुत्रा – त् + र् + आ = त्रा

वास्तव – स् + त् + अ् = स्त

उत्सव – त + स + अ = त्स

स्वाध्याय – संयुक्त व्यंजने असलेली जोडाक्षरे लिही.

❊ **खालील जोडाक्षरे वाच व लिही.**

आरोग्य	रक्त	प्रल्हाद	स्नान	अरण्य
क्लेश	जाड्या	हत्या	स्मरण	श्लेष
प्लेग	गोट्या	ध्यान	रूग्ण	पश्चात
आस्वाद	जेष्ठ	जन्म	अश्म	पद्म
जिव्हा	ज्वर	कष्ट	प्रश्न	द्वंद्व
ब्रम्ह	चिन्ह	कल्पना	वह्या	मनस्वी

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

7. जात कोणती पुसू नका

C6X9P2

जात कोणती पुसू नका
धर्म कोणता पुसू नका
उद्यानातील फुलास त्यांचा
रंग कोणता पुसू नका ।।धृ।।

हिरवा चाफा कमळ निळे
सुखद सुमांचे गंध मळे
एकच माळी या बागेचा
भाव तयाचे पुसू नका ।।1 ।।

सद्धर्माचा एकच न्याय
कष्टाचा एकच अध्याय
डाव्या उजव्या करात नाही
भेद मानुनी फसू नका ।।2 ।।

रहिम दयाळू तसाच राम
मस्जिद मंदिर मंगल धाम
जपून शांतीचा मंत्र मुखाने
एक दुजाला डसू नका ।।3 ।।

जन्मा आलो मुले म्हणुनी
भारतभूच्या कुशी मधूनी
अभेद्य आम्ही अजिंक्य आम्ही ।
नाव आमचे पुसू नका ।।4 ।।

सुपूत्र भारत मातेचे
आम्ही जवाहर देशाचे
जात कोणती धर्म कोणता
सवाल असले करू नका ।।5 ।।



❊ कवी-यशवंत देव

© KSBP NOT TO BE REPUBLISHED

नवीन शब्दार्थ-

पुसणे – विचारणे
उद्यान – बाग
सुमांचे – सुमनांचे या शब्दाचे छोटे रूप
मस्जिद – मुसलमानांचे प्रार्थना स्थळ
दुजा – दुसरा, परका
डसणे – चावणे, दंश करणे
अभेद्य – भेदू न शकणारी
सवाल – प्रश्न
भू – भूमी, जमीन

अभ्यास

अ. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिही.

1. उद्यानातील फुलाला काय विचारू नका असे कवी म्हणतो?
2. चाफा व कमळ यांच्यात कोणते साम्य आहे?
3. रहिमाप्रमाणे आणखी कोण दयाळू आहे?
4. या कवितेच्या कविचे नांव लिही?

आ. दोन किंवा तीन वाक्यात उत्तरे लिही.

1. चाफा व कमळाच्या बाबत कविने कोणते भाव व्यक्त केले आहेत?
2. आपण सर्व एक आहोत यासाठी कविने कोणती उदा. दिली आहेत?
3. नाव पुसू नका असे कवी का म्हणतो?

इ. पहिल्या दोन पदांशी संबंध ओळखून तिसऱ्या पदाशी संबंध जुळणारा शब्द लिही.

चाफा : हिरवा : : कमळ :

NOT TO BE REPUBLISHED © KTBS

सद्धर्म : न्याय : : कष्ट :

रहिम : मस्जिद : : राम :

ई. 'पुसणे' हा शब्द 'विचारणे' या अर्थाने आला आहे. तसाच 'स्वच्छ करणे' या अर्थानेही येतो.

हे अर्थ होणारी दोन वेगवेगळी वाक्ये तयार कर. तसेच कर, तन, वर, रवी, फोड, दर, नाव या शब्दांची वेगवेगळ्या अर्थांची प्रत्येकी 2 वाक्ये तयार कर.

उ. या कवितेतील प्रासबद्ध शब्द शोधून लिही.

उदा :निळे – मळे

_____ _____

_____ _____

_____ _____

_____ _____

ऊ. जोड्या जुळव.

अ	ब
1. हिंदू	विहार
2. मुस्लीम	चर्च
3. शीख	मंदिर
4. ख्रिश्चन	गुरुव्दार
5. बौद्ध	मस्जिद

❊ उपक्रम -

1. 'राष्ट्रीय एकात्मता' या विषयावर आठ ते दहा ओळी लिही.
2. वेगवेगळी वेशभूषा करून राष्ट्रीय सण, सांस्कृतिक कार्यक्रमात एकात्मतेचे दर्शन घडवा.
3. आपण सर्वांनी राष्ट्रीय एकात्मता का जोपासली पाहिजे हे शिक्षकाकडून समजून घे.

❊ हे असेच लिही.

सर्वजण, वार्ताहर, दुरभिमान, गणवेश

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

८. माझे ध्येय

H9N7V2



(सरानी वर्गात प्रवेश करताच विद्यार्थ्यांचे चेहरे उजळले. कारण अगोदरच्या दिवशी शिकविलेल्या 'माझे ध्येय' या विषयावर आज चर्चा होणार होती.)

सर्व विद्यार्थी : (उभे राहत) सुप्रभात गुरूजी!

शिक्षक : सुप्रभात, सर्वांनी बसावे.

रजत : सर तुम्ही काल सांगितल्याप्रमाणे 'माझे ध्येय' या विषयावर आम्ही चर्चा करायला तयारी करून आलोय. आता चर्चेला सुरूवात करायची का?

शिक्षक : अरे हो हो, पण तुम्ही सर्वांनी आपापली ध्येये ठरवून आलाय ना?

सर्वजण : हो सर, आमच्या जीवनातील ध्येय आम्ही ठरविले आहे.

© @KTBS NOT TO BE REPUBLISHED

शिक्षक : वेदांत प्रथम तू सांग पाहू, तुझे ध्येय कोणते आहे?

वेदांत : सर मला माझ्या भारत देशाबद्दल फार अभिमान आहे. त्यामुळे या देशाचे संरक्षण करणारा, प्रसंगी प्राणाची आहुती देणारा सैनिक व्हावेसे वाटते.

शिक्षक : छान, पण त्यासाठी सुदृढ शरीर, चपळता, आज्ञापालन, धाडस, जिद्द हे गुण अंगी असायला हवेत.

वेदांत : हो सर, त्यासाठी मी आतापासून दररोज सकाळी भरपूर व्यायाम करीत आहे. शाळेमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे खेळ खेळून मनाची एकाग्रता वाढवीन. धावणे, वजन उचलणे, उंची, छाती, अशा प्रकारची शारीरिक तंदुरुस्ती त्याबरोबरच बौद्धीक चाचणीही द्यावी लागते असे आमचा मामा म्हणत होता. ते सैनिकच आहेत. मी त्यांच्याकडून मार्गदर्शन घेईन.

शिक्षक : अरे वा! हे तर फारच छान झाले. एखादे ध्येय साध्य करण्यासाठी त्या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींचा सल्ला घेणे हे फारच उत्तम होय. श्रेया तू सांग बर, तुला काय वाटते?

श्रेया : सर, मला खेळाडू व्हावेसे वाटते. त्यासाठी भरपूर मेहनत घ्यायची माझी तयारी आहे.

शिक्षक : अगं त्यासाठी प्रथम तालुका, जिल्हा, तसेच राज्य पातळीवरील स्पर्धेत नैपुण्य मिळवावे लागेल. शिवाय शारीरिक तंदुरूस्ती राखावी लागते.

आर्यन : सर, शारीरिक तंदुरूस्ती म्हणजे काय हो?

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

शिक्षक : अरे, जेवणामध्ये समतोल आहार घेणे, त्याशिवाय दररोजचा शारीरिक व्यायाम केल्याने आपले शरीर सुदृढ बनते आणि खेळाडू बनण्यासाठी शरीर सुदृढ असणे फार महत्वाचे असते.

श्रेया : हो सर, मी दररोज एक ग्लास दूध पिते. शिवाय सकाळी व्यायामही करते.

शिक्षक : शाब्बास, आता मला सांग, तुझे आदर्श खेळाडू कोण आहेत?

श्रेया : पी.टी. उषा, के. मल्लेश्वरी, सानिया मिर्झा, सायना नेहवाल, अंजूम चोप्रा या सर्व भारतीय महिला खेळाडूंचा आदर्श माझ्या डोळ्यासमोर आहे.

आर्यन : सर, ही नेहमी म्हणत असते. स्त्री ही कोणत्याच क्षेत्रात पुरुषापेक्षा कमी नाही.

शिक्षक : अरे हो, अगदी बरोबर आहे तिचे. क्रीडा क्षेत्राबरोबरच इतर क्षेत्रात लता मंगेशकर, कल्पना चावला, सुनिता विल्यम्स, किरण बेदी, इंदिरा गांधी, प्रतिभाताई पाटील या भारतीय महिलांनी आपला ठसा उमटविला आहे.

आर्यन : हो सर, 'चूल आणि मूल' ही परंपरागत चालत आलेली रूढ पद्धती बदलली आहे. हो ना?

शिक्षक : अगदी योग्य बोललास. तन्वीर तुला काय वाटते?

तन्वीर : सर, मला वाटते एक छानपैकी नोकरी करावी. त्यामुळे आमच्या घरची गरिबी नाहीशी होईल. घरातील वातावरण सुधारेल. शिवाय नोकरी करत लेखन करणे किंवा वाचनाचा छंदही जोपासता येतो. तसेच ठराविक वेळेनंतर निवांत राहता येते.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

शिक्षक : हो, तुला वाचनाची आवड आहे ना. ठीक, वैभव तू सांग पाहू.

वैभव : सर, मला समाज सुधारक व्हावेसे वाटते. पण मला याबद्दल अधिक माहिती नाही. तुम्ही सांगाना.

शिक्षक : समाजसुधारकाने स्वतःचे सुख पाहून चालत नाही. इतरांच्या दुःखाचा विचार करावा लागतो. स्वार्थाला त्यागून परमार्थ स्वीकारावा लागतो. पण घाबरू नकोस 'केल्याने होत आहे रे आधी केलेची पाहिजे' यासाठीच म्हटले जाते.


वैभव : समाज सुधारकानीच आपल्या देशाचा इतिहास बदलला आहे. हो ना सर?

शिक्षक : हो, अगदी बरोबर, महात्मा फुले, आगरकर, राजाराम मोहनरॉय, बाबा आमटे, संत गाडगे बाबा, मदर तेरेसा यांनी समाज सुधारण्याचे ध्येय उराशी बाळगून ते पूर्ण करून समाजात क्रांती घडविली.

रजत : पण सर, त्यावेळेचा काळ वेगळा होता. आजच्या समाजाला समाज सुधारकांची खरोखरच गरज आहे का?

शिक्षक : रजत, जमाना जरी बदलला असला तरी समाज सुधारकांची गरज आजही आपल्या देशाला आहेच. 'ग्राम स्वच्छता आंदोलन' 'निर्मल ग्राम योजना' अशा योजना चालू आहेत. पण तुम्हाला माहीत आहे का? कुष्ठरोग्यांची सेवा करून वयस्कर निराधाराना आधार देणारे बाबा आमटे, शेतकऱ्यांच्या हक्कासाठी लढणाऱ्या मेधा पाटकर, राळेगणसिद्धी येथील उजाड माळरानाला नंदनवनाचे रूप देणारे आण्णा हजारे, अशा अनेक समाजसुधारकांमुळेच देशाला प्रगतीच्या वाटेवर आणणे शक्य झाले आहे. तसेच प्रत्येक सर्वसामान्याने आपल्या परीने समाज सुधारकाची भूमिका पार पाडायची असते.

© MSCERT NOT TO BE REPUBLISHED



सोहेल : रजत अरे बोल ना, तुला काय व्हावेसे वाटते?

रजत : सर, मला एखादी कला जोपासावी वाटते. पण या क्षेत्रात करियर करणे सोपे आहे का?

शिक्षक : रजत अरे, कलाक्षेत्रातच नव्हे कोणत्याही क्षेत्रात करियर करणे सोपे नाही. त्यासाठी अविरत परिश्रम, कलेवर निष्ठा, तसेच आत्मविश्वास या गोष्टींची गरज असते.

रजत : पण सर, माझे आजोबा म्हणतात, कलाक्षेत्रातून समाजप्रबोधन व्हावे. हे योग्य आहे का?

शिक्षक : होय रजत, कलाक्षेत्रात प्राविण्य मिळवितानाच त्यातून समाज प्रबोधन केले तर आपण समाजाचे ऋण फेडल्यासारखे होते.

सोहेल : पण सर, नेमकी कला जोपासणे म्हणजे काय हो?

© MTBS NOT TO BE REPUBLISHED

शिक्षक : अरे, आपल्या आवडत्या विषयात रस घेऊन त्यामध्येच जास्तीत जास्त पारंगत होणे म्हणजे कला जोपासणे होय. तुला वाद्य वाजविण्याची आवड आहे ना?

सोहेल : हो सर.

शिक्षक : त्यातच अधिक पारंगत होत जाणे म्हणजे कला जोपासणे होय. शहनाई वादक बिस्मिल्ला खान, चित्रकार एम.एफ.हुसेन, संगीत दिग्दर्शक ए. आर. रेहमान, अभिनय क्षेत्रात दिलीप कुमार, अमिताभ बच्चन, तबला वादक झाकीर हुसेन, शास्त्रीय गायिका गंगुबाई हनगल, पं. भिमसेन जोशी इत्यादींनी कलेतूनच आपले करियर घडविले. शिवाय समाज प्रबोधन करून समाजाला नवी दिशा दिली.

रजत : सर, सर, हा आनंद म्हणतो. याला शेती व्यवसाय करायचा आहे. (सर्व – मुले हसतात.)

शिक्षक : अरे, त्याने योग्य विचार केलाय. त्यावर असे हसू नका. शाब्बास! आनंद तुझे बाबा शेतकरीच आहेत ना.

आनंद : हो सर, त्यांचे बी.ए. पर्यंतचे शिक्षण पूर्ण झालेले आहे. तरीसुद्धा ते शेती व्यवसायाला कमी मानीत नाहीत.

शिक्षक : अगदी बरोबर, अरे शेतकरी आहे म्हणून संपूर्ण जनतेला अन्नधान्य खायला मिळते. शेती बरोबर काही कुटीरोद्योगही करता येतात.

आनंद : सर, आमच्या शेतामध्ये आम्ही पशुपालन करतो. मला कोंबड्यांची निगा राखायला म्हणजेच त्यांना दाना–पाणी करायला फार आवडते.

वेदांत : सर, माझे वडील म्हणतात, शेतीत नवीन तंत्रज्ञानाचा वापर करायला हवा. नवीन तंत्रज्ञान म्हणजे काय हो सर?

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

शिक्षक : छान! फक्त पावसाच्या भरवशावर राहून शेती न करता आपल्या शेतात जर पाण्याची व्यवस्था केली तर शेती व्यवसाय उत्तम प्रकारे करता येतो.

आनंद : **हो सर! आम्ही शेतात बोअरवेल मारणार आहोत. असे वडील म्हणत होते.**

शिक्षक : कॅथरीन अगं. तु काही बोललीच नाहीस?

कॅथरीन : सर, मला तुमच्या सारखेच आदर्श शिक्षिका व्हावेसे वाटते.

शिक्षक : शाब्बास! तुझे आजोबा सुद्धा शिक्षक होते ना?

कॅथरीन : हो सर, तेच मला सांगत असतात. शिक्षक झाल्यास आजच्या युवा पिढीला घडविता येते. पुढे हीच पिढी देशाचा आधारस्तंभ बनते.

शिक्षक : अगदी बरोबर. कोणत्याही क्षेत्रात प्रगती करावयाची असल्यास गुरूशिवाय पर्याय नाही. तुमच्यासारख्या लहान मुलांना लहानपणीच योग्य शिस्त आणि शिक्षण मिळाल्यास जगात भारत देश अव्वल होईल यात शंकाच नाही.

आर्यन : सर, आम्हा सर्वांची ध्येये पूर्ण करण्यासाठी कोणत्या गोष्टींची जरूरी आहे?

शिक्षक : मुलानो, आजच्या विज्ञान युगात प्रत्येकाने प्रथम ध्येय निश्चित केले पाहिजे. त्यानंतर ते ध्येय गाठण्यासाठी आत्मविश्वास, जिद्द, चिकाटी, त्याग, एकाग्रता, श्रद्धा या गोष्टींची जरूरी आहे. ध्येयहीन माणूस हा शीड नसलेल्या जहाजासारखा समुद्रामध्ये भरकटत असतो. तुम्ही कोणतेही ध्येय निश्चित करा. पण त्यात इतकी प्रगती करा की तुमच्यासारखे तुम्हीच असाल. समाजातील सर्व घटक एकमेकावर अवलंबून असतात. त्यांच्या सहकार्यानेच प्रगती होत असते. ही प्रगती म्हणजेच देशाची प्रगती होय.

© DTE&S NOT TO BE REPUBLISHED

आनंद : सर, तुम्ही आमच्या जीवनाला उपयुक्त अशी माहिती दिलीत. तुम्ही केलेल्या सूचनांचे आम्ही अवश्य पालन करू.

सर्व मुले : धन्यवाद सर.

नवीन शब्दार्थ-

उजळणे – प्रकाशित होणे

आहुती – अर्पण करणे

तज्ञ – जाणकार

नैपुण्य – प्राविण्य

करिअर – भवितव्य, जीवन घडविणे

ऋण – कर्ज

तंदुरुस्त – सुदृढ

अभ्यास

अ. कोणाला काय व्हावेसे वाटते त्या प्रमाणे जोडया जुळव.

अ	ब
तन्वीर	सैनिक
रजत	खेळाडू
आनंद	नोकरी
वेदांत	समाजसुधारक
कॅथरीन	कलाक्षेत्र
श्रेया	शेती व्यवसाय
वैभव	शिक्षिका

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

आ. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिही.

1. वर्गात कोणत्या विषयावर चर्चा होणार होती ?
2. सैनिकाच्या अंगी कोणते गुण हवेत?
3. शरीरिक तंदुरूस्ती म्हणजे काय?
4. महिलांसाठी परंपरागत चालत आलेली पद्धत कोणती?
5. देशाला प्रगतीच्या वाटेवर कोणी आणले आहे?
6. नवीन तंत्रज्ञानाचा वापर कोठे व्हायला हवा?
7. तुझे ध्येय कोणते आहे?

इ. खालील प्रश्नांची दोन तीन वाक्यात उत्तरे लिही.

1. श्रेयाच्या डोळ्यासमोर कोणत्या खेळाडूंचा आदर्श आहे?
2. समाज सुधारक कसा असावा असे शिक्षक सांगतात?
3. कलाक्षेत्रात करिअर करण्यास कोणत्या गोष्टींची जरूरी आहे?
4. शेतीमध्ये नवीन तंत्रज्ञानाचा वापर कसा करता येईल?
5. आपले ध्येय पूर्ण करण्यासाठी कोणत्या गोष्टींची जरूरी आहे?
6. तुझे ध्येय पूर्ण करण्यासाठी तू काय काय करशील?

ई. खालील वाक्ये कोणी कोणाला म्हटली आहेत ते संदर्भासह स्पष्टीकरणदे.

1. ''मला माझ्या भारत देशाबद्दल फार अभिमान आहे.''
2. ''मला खेळाडू व्हावेसे वाटते.''
3. ''स्त्री ही कोणत्याच क्षेत्रात पुरूषापेक्षा कमी नाही.''
4. ''कलाक्षेत्रातून समाज प्रबोधन व्हायला हवे.''

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

उ. खालील रिकाम्या चौकोनात त्या त्या क्षेत्रातील व्यक्तिंची पाठातील नांवे लिही.

उदा :	माजी पंतप्रधान	–	इंदिरा गांधी
	प्रसिद्ध गायिका	–	
	अंतराळवीर		
	I.P.S.अधिकारी	–	
	महिला राष्ट्रपती	–	

ऊ. खालील खेळ व खेळाडूंच्या जोड्या जुळव व लिही.

पी.टी. उषा	वेटलिफ्टींग	_____	_____
टेनिस	अंजूमचोप्रा	_____	_____
सायना नेहवाल	धावपट्टू	_____	_____
क्रिकेट	के. मल्लेश्वरी	_____	_____
सानिया मिर्झा	बॅडमिंटन	_____	_____

ए. 'क्रिकेट' हा खेळ तुला खूपच आवडतो ना? खाली भारतीय क्रिकेटवीरांची नावे दिली आहेत. त्यावरून त्यांचे आडनांव शोधा पाहू.


1. सुनील गा ___ ___ ___ ___
2. रवी शा ___
3. कपिल देव ___ खं ___
4. सचिन तें ___ ___ ___ ___

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

5. विरेंद्र ___ ___ ___ ग
6. महेंद्रसिंग ___ नी
7. सौरभ गां ___ ___
8. राहुल ___ वि ___
9. अनिल ___ ___ ळे
10. विराट को ___ ___

ऐ. शब्द खेळ.

खालील आकृतीतील उत्तरे 'चि' या अक्षराने सुरू होतात. चित्राखाली दिलेली वाक्ये वाच व त्यासाठी पर्यायी शब्द चित्रातील पाकळीत लिही.



1. सुट्टे पैसे.
2. म्हणजे भरपूर बरं का!
3. कमळ यात उगवते.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

4. भांडे उचलताना लागणारे साधन.
5. कष्टाळूपणाबरोबरच यशस्वी होण्यासाठी हाही गुण आवश्यक आहे.
6. गोड पदार्थ खाल्ले की हात असे होतात.
7. काश्मीरमध्ये हे वृक्ष पहावयास मिळतात.
8. दिवाळीच्या फराळात लाडूबरोबर हा असतो.

❊ **हे असेच लिही** - शरीर, प्रावीण्य, पारंपरिक, सुज्ञ.

व्याकरण

'र' या व्यंजनाने तयार होणारी जोडाक्षरे. खालील जोडाक्षरे वाच.

1.	क्रमिक,	वज्र,	नम्र,	प्रिय,	सहस्त्र
2.	ड्रिल,	ड्रम,	ड्रॉईंग,	ट्रक,	ट्रॅक्टर
3.	अर्क,	तर्क,	शर्ट,	कार्ड,	कर्ण
4.	गृह,	नृप,	पृथ्वी,	मृग,	हृदय
5.	कुऱ्हाड,	पायऱ्या,	मिऱ्या,	सुऱ्या,	चऱ्हाट

1. क्रमिक, वज्र, नम्र, प्रिय, सहस्त्र

या जोडाक्षरात काना (उभीरेषा) असलेल्या व्यंजनाला 'र' हे अक्षर आल्यास ते (⌐) अशा 'रकार' चिन्हाने जोडले जाते.

उदा : क् + र =क्र

2. ड्रिल, ड्रम, ड्रॉईंग, ट्रक, ट्रॅक्टर

या जोडाक्षरात काना नसलेल्या व्यंजनाला 'र' हे अक्षर जोडावयाचे झाल्यास त्या अक्षराच्या खाली (ˆ) अशा 'काकपद' चिन्हाने जोडले जाते.

उदा : ड् + र = ड्र

@KYBS NOT TO BE REPUBLISHED

3. अर्क, तर्क, शर्ट, कार्ड, कर्ण

'र' या व्यंजनाला दुसरे अक्षर जोडताना आधीच्या अक्षराच्या उच्चारावर जोर येत असेल तर दुसऱ्या अक्षराच्या डोक्यावर (◌्र) अशा 'रफरि' चिन्हाने जोडले आते.

उदा : सूर्य या शब्दाचा उच्चार करताना 'सू' या अक्षरावर जोर दिला जातो. म्हणून 'र' ला 'य' जोडताना र्+य+अ=र्य

4. गृह, नृप, पृथ्वी, मृग, हृदय.

ऋ हा वर्णमालेतील एक स्वर आहे. बाराखडी तयार होताना क्+अ=क, क्+आ=का, हे जसे होते. तसे क्+ऋ=कृ, ग्+ऋ=गृ. हे तयार होतात. तेव्हा लक्षात घ्या. कृ, गृ, मृ ही जोडाक्षरे नसून ते एक अक्षर आहे. 'ऋ' या स्वराच्या ऐवजी त्याला (◌ृ) 'ऋकार' चिन्हाचा वापर करतो.

5. कुऱ्हाड, पायऱ्या, मिऱ्या, सुऱ्या, चऱ्हाट.

'र' च्या मागील अक्षरावर उच्चारताना जोर येत नसेल तर 'र' जोडताना (विशेषतः 'र' आणि 'य' सोबत)
(ः) हे चिन्ह वापरतात.

स्वाध्याय

वर दिलेल्या प्रत्येक गटातील प्रत्येकी पाच जोडाक्षरे लिही.

_____ _____ _____ _____ _____

_____ _____ _____ _____ _____

_____ _____ _____ _____ _____

© KTBS NOT TO BE REPUBLISHED


9. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज

Y4E8J9

आपला देश प्रगती पथावर नेऊन उन्नत करावयाचा असेल तर प्रत्येक गाव स्वयंपूर्ण झाले पाहिजे. ते गाव शिक्षण, आरोग्य, उद्योग या सर्व बाबतीत विकसित झाले पाहिजे. त्यासाठी लोकशिक्षण हवे, लोकामधील आळस घालवला पाहिजे अशा विचारांच्या तुकडोजी महाराजानी समाजोन्नतीसाठी अनेक कामे केली.

तुकडोजी महाराजांचा जन्म 29 एप्रिल 1909 रोजी अमरावती जिल्ह्यातील 'यावली' नावाच्या छोट्याशा गावी झाला. बंडोजी ठाकूर ब्रम्हभट्ट हे त्यांचे वडील. त्यांच्या आईचे नांव मंजुळादेवी. तुकडोजींचे लहानपणीचे नाव माणिक होते. माणिकला लहानपणापासूनच ईश्वरचिंतन, भजन याची आवड होती.

भक्त पुंडलिकाप्रमाणे आपणही आई-वडिलांची सेवा करावी म्हणजे पांडूरंग दर्शन देईल असा विचार मनात आला. पुढे ते गावोगावी जाऊन भजन करू लागले. लोक त्यांच्या भजनाने प्रभावित होत. माणिक स्वतः भजनांची रचना करत आणि म्हणत. माणिकला लोक 'देवबाबा' म्हणू लागले. भजनाच्या निमित्तानं एकत्र



© MSCERT NOT TO BE REPUBLISHED

येणाऱ्या समुदायाला त्यांच्या उन्नतीसाठी प्रवृत करावे असे त्यानी ठरविले. तरूण कार्यकर्त्यांची संघटना तयार केली. त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी धर्म सेवाश्रमाची स्थापना केली.

तुकडोजी महाराजांच्या संघटनेतले काही कार्यकर्ते लोकाना मार्गदर्शन करत. मग झाडू, खराटे, पाट्या आणून सफाईला सुरुवात होई. कचरा काढून गोळा करीत असत. लहान लहान खड्डे भरून घेत. सांडपाण्याला वाट करून देत. कचरा लोटत लोटत गावाबाहेर नेत. आणि तिथे मोठी चर खणून त्यात टाकत. असं स्वच्छतेच काम होई. त्या स्वच्छ रस्त्यावर, घराभोवतीच्या स्वच्छ जागेत शेणसडा टाकून सारवून घेत. रांगोळी काढत. गावाचं हे बदललेलं रूप सारे निरखत. स्वच्छतेचा एक वेगळा आनंद अनुभवत.

स्वच्छता करून न थांबता त्या कचऱ्याचा योग्य वापर कसा करावा हेही शिकवलं. ''खतातून अन्न व अन्नातून खत''हा संदेश गावोगावी पोहचवला. त्यातून स्वच्छतेचा आनंद तर मिळालाच पण उत्पादन वाढवून अधिक अन्न निर्मितीच सुखही मिळालं. समाजात रोगराई कमी झाली. लोकांच आरोग्य सुधारलं. स्वस्थता येऊ लागली. तुकडोजी महाराजांच्या स्वच्छता संदेशाचं हे महत्व आहे.

स्वच्छ निर्मळ हवा, पाणी मिळविण्यासाठीचं हे शिक्षण लोकांचे आरोग्य सुधारण्यासाठी फार उपयोगी पडले. छोटी छोटी खेडी हा देशाचा खरा आधार असतात, शहरं सुधारून खेडी मागास राहिली तर देशाचा विकास होणार नाही. तेव्हा स्वावलंबन, श्रम, प्रतिष्ठा, उद्योगप्रियता लोकांच्या मनात सतत जागृत ठेवण्याचे काम केले.

गावं सक्षम झाली पाहिजेत, स्वावलंबी बनली पाहिजेत यासाठी तुकडोजी सतत काम करत राहिले. लेखन करत राहिले. भजनं व भाषणं करत राहिले. लोक शिक्षणाचं हे थोर काम केल्यामुळेच त्यांना ''राष्ट्रसंत'' म्हणून ओळखलं जातं.

सध्या संपूर्ण भारतभर ''स्वच्छता अभियान'' सुरू आहे. कर्नाटक शासनाने सुद्धा खेडी सुधारावी या हेतुने 'निर्मल ग्राम स्वच्छता अभियान' सुरू केले आहे. त्यासाठी आर्थिक सहकार्य व पुरस्कारांची घोषणा केली आहे. तुकडोजी महाराजांचा आदर्श घेऊन आपला गाव ''निर्मल ग्राम'' करण्यासाठी आपण आपल्या घरापासून, शाळेपासून, परिसरापासून सुरूवात करूया व देशाचा विकास करूया.

NOT TO BE REPUBLISHED © KTBS

नवीन शब्दार्थ-

उन्नत – श्रेष्ठ, उच्च
स्वयंपूर्ण – परिपूर्ण
प्रवृत्त – तयार, उद्युक्त
संदेश – निरोप
स्वावलंबन – स्वःताचे काम स्वतः करणे
निरखणे – पाहणे
पुरस्कार – पारितोषिक, बक्षीस

अभ्यास

अ. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिही.

1. तुकडोजी महाराजांचे पूर्ण नाव काय?
2. माणिकला लोक कोणत्या नावाने बोलवू लागले?
3. धर्म सेवाश्रमाची स्थापना का केली?
4. देशाचा खरा आधार कोण आहे?
5. कर्नाटक शासनाने कोणते अभियान सुरू केले आहे?
6. स्वच्छतेची सुरूवात कोठून केली पाहिजे?

आ. खालील प्रश्नांची दोन तीन वाक्यात उत्तरे लिही.

1. तुकडोजी महाराजांचा जन्म केव्हा व कोठे झाला ?
2. गावकरी स्वच्छतेचा वेगळा आनंद केव्हा अनुभवत?
3. तुकडोजीनी गावोगावी कोणता संदेश पोहचविला?
4. संघटनेचे कार्यकर्ते स्वच्छता कशी करत असत?
5. तुकडोजीना 'राष्ट्रसंत' म्हणून का ओळखले जाते?
6. तुकडोजींचे विचार काय होते?

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

इ. कंसातील योग्य शब्द शोधून रिकाम्या जागा भर.

(स्वच्छ, मंजुळादेवी, पुरस्काराची, सक्षम, माणिक)

1. तुकडोजी महाराजांचे लहानपणीचे नाव _____ होते.
2. तुकडोजीच्या आईचे नाव _____ होते.
3. गावं _____ झाली पाहिजेत.
4. कर्नाटक शासनाने आर्थिक सहकार्य व _____ घोषणा केली आहे.
5. आपण दररोज अंगण _____ केले पाहिजे.

ई. विरूध्दार्थी शब्द लिही.

1. प्रगती ×
2. आळशी ×
3. विकसित ×
4. स्वच्छ ×
5. आनंद ×
6. देशभक्त ×

उ. समानार्थी शब्द लिही.

1. देव –
2. आई –
3. शहर –
4. लोक –
5. सफाई –
6. झाडू –

ऊ. खालील शब्द नमुन्याप्रमाणे लिही.

नमुना : आई - वडील

1. हवा –
2. केर –
3. साफ –
4. अन्न –
5. रोग –
6. साधू –

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

ए. खालील शब्दांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग कर.

1. सहकार्य –
2. पुरस्कार –
3. निर्मल ग्राम –
4. जागृत –
5. स्वावलंबी –
6. अभियान –
7. उद्योग –
8. प्रशिक्षण –

ऐ. ''खतातून अन्न व अन्नातून खत'' या संदेशाचा शिक्षकांच्या मदतीने अर्थ स्पष्ट कर.

ओ. ''आपला गाव निर्मल ग्राम'' बनविण्यासाठी तू काय करशील या विषयावर आठ ते दहा ओळी निबंध लिही.

औ. वाच व समजून घे.

1. सगळे मुसळ केरात.
2. शहाण्याला शब्दाचा मार.
3. गर्जेल तो पडेल काय?
4. कुत्र्याची शेपटी वाकडी ती वाकडीच
5. नाव मोठे लक्षण खोटे.
6. भित्यापाठी ब्रम्हराक्षस

❊ **उपक्रम** - गांडूळ खत निर्मिती प्रकल्पाची माहिती जाणकाराकडून समजून घे.

❊ **हे असेच लिही** - माहात्म्य, करूया, स्वीकार

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

शब्दांच्या जाती

मागील इयत्तेत तुम्ही शब्दांच्या जाती आठ आहेत. आणि त्यांचे **कारक शब्द व अविकारक शब्द** असे दोन गट आहेत हे शिकलात. कारक शब्दांच्या गटात नाम, सर्वनाम, विशेषण, व क्रियापद येते तर अविकारक शब्दांच्या गटात क्रियाविशेषण, शब्दयोगी अव्यय, उभयान्वयी अव्यय व केवल प्रयोगी अव्यय हे येतात, हे देखील शिकलात. आता आपण कारक शब्दांच्या गटाचा सविस्तर अभ्यास करू.

नाम

खालील शब्द वाच आणि खाली दिलेल्या तक्त्यात उदाहरणात दाखविल्या प्रमाणे त्या त्या गटात येणारे तुझ्या मनाचे शब्द लिही.

वस्तूचे नाव	पदार्थाचे नाव	स्थळाचे नाव	नदीचे नाव	व्यक्तीचे नाव	गुणधर्म
पुस्तक	दूध	बेंगळूरु	गंगा	रामराव	सौंदर्य
खुर्ची	तेल	औरंगाबाद	कावेरी	ज्यूली	शौर्य

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

वरील तक्त्याचा अभ्यास केल्यानंतर आपण असे सांगू शकतो की व्यक्ती, वस्तू, पदार्थ, स्थळ यांची नावे आणि त्यांच्या गुणधर्मांच्या नावाला **नाम** असे म्हणतात.

* नामाचे प्रकार तीन आहेत.

1. सामान्य नाम 2. विशेष नाम 3. भाववाचक नाम

1. **सामान्य नाम :** एकाच जातीच्या वस्तूना किंवा पदार्थांना, प्राण्यांना सामान्यपणे जे नाव देतो त्याला **सामान्य नाम** असे म्हणतात. उदा : मुलगी, गाय, दूध, नदी, खेडं, शहर, कळप, टोळी, लोणी, तूप, पाणी, तांदूळ, जोंधळा, लोखंड, सोनं इत्यादी.

2. विशेष नाम :

खालील शब्द वाच

भारत, अमेरिका, कर्नाटक, रॉबर्ट, गोविंद, राधा, मैसूरु, रामनगर, हिमालय, जानेवारी, गोदावरी, नर्मदा.

वरील उदाहरणात भारत, अमेरिका ही देशांची नावे आहेत. कर्नाटक हे राज्याचे नाव आहे. रॉबर्ट, गोविंद ही मुलांची नावे आहेत.

यावरून आपण असे म्हणू शकतो की, ज्या नामावरून केवळ एकाच व्यक्ती, स्थळ, वस्तू इत्यादीचा बोध होतो आणि त्या व्यक्ती, वस्तू, स्थळाला ठेवलेल्या नावाला **'विशेषनाम'** असे म्हणतात.

3. भाववाचक नाम:

खालील शब्द वाच.

शौर्य, सौंदर्य, गरीबी, श्रीमंती, मोठेपण, शहाणपण, प्रामाणिकपणा, धिटाई, गुलामगिरी, सोनारकी, लोहारकी इ.

वरील शब्दातून गुण, स्थिती, व्यवसाय यांची माहिती मिळते. यावरून आपण असे म्हणू शकतो की, ज्या नामावरून वस्तूंच्या, पदार्थांच्या किंवा व्यक्तिच्या ठिकाणी असलेले गुण, भाव, स्थिती, व्यवसाय यांचा बोध होतो. त्यांना **'भाववाचक नाम'** असे म्हणतात.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

स्वाध्याय

1. प्रत्येकी दहा सामान्यनाम, विशेषनाम, आणि भाववाचकनाम लिही.

10. विद्यार्थ्याना बोध



बाळबोध अक्षर। घडसुनी करावे सुंदर।
जे देखतांचि चतुर। समाधान पावती ।।1।।

वाटोळे सरळे मोकळे। वोतले मसीचे काळे।
कुळकुळीत वळी चालिल्या ढाळे। मुक्त माळा जैशा ।।2।।

अक्षर मात्रा तितुके नीट । नेमस्त पैस काने नीट ।
आडव्या मात्रा त्याही नीट। आर्कुली वेलांट्या।।3।।

पहिले अक्षर जे काढिले । ग्रंथ संपेत्तो पाहात गेले।
एका टाकेचि लिहिले। ऐसे वाटे ।।4।।

वोळीस वोळी लागेना। अर्कुली मात्रा भेदीना।
खाचिले वोळीस स्पर्शेना। अथवा लंबाक्षर ।।5।।

पान शिष्याने रेखाटावे । त्यावरि नेमकेचि लिहावे।
दुरी जवळी न व्हावे। अंतर वोळींचे ।।6।।

ज्याचे वय आहे नूतन । त्याने ल्याहावे जपोन।
जनासी पडे मोहन। ऐसे करावे।।7।।

समर्थ रामदास-

मूल्य – स्वयंशिस्त, स्वच्छता, सुंदरता, क्रमबद्धता आणि अभ्यासाची आवड.

नवीन शब्दांचे अर्थ

बाळबोध – साधे नेमस्त– नेमून दिव्याप्रमाणे

चतुर – हुशार अर्कुली – उकार

घडसुनी – प्रयत्न करून/पुन्हा पुन्हा लिहिणे, घटवणे

वोतले – ओतले

मसीचे – शाईचे

वळी – ओळी

अभ्यास

अ. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिही.

1. अक्षर सुंदर कसे असावे?
2. चतूर केव्हा समाधान पावतील?
3. काना, मात्रा, वेलांटी संबंधी समर्थ काय सांगतात?
4. ओळी लिहिताना कोणती काळजी घ्यावी?
5. जपून लिहिण्याचा संदेश कोणाला दिला आहे?

आ. खालील प्रश्नांची उत्तरे 2-3 वाक्यात लिही.

1. विद्यार्थ्यांनी लिहिताना कोणती काळजी घ्यावी असे समर्थ रामदासाना वाटते?
2. सुंदर हस्ताक्षरासाठी तू कोणते प्रयत्न करतोस?

*** हे असेच लिही.**

शील, सुवाच्च, पेन्सील, दीपावली

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

महत्त्वाच्या तीन गोष्टी

चित्रे : प्रमोद देवरूखकर



NOT TO BE REPUBLISHED © PSBS



© KTS NOT TO BE REPUBLISHED